गुरुवार, 06 ऑक्टोबर 2022

⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 63

Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THRUSDAY 06 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-63 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5




# मुंडे साहेबांचा संघर्ष हीच माझी ओळख

## पंकजा मुंडेंचा एल्गार : मी कधीही कोणासमोर झुकणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**बीड : मी संघर्षाला घाबरत नाही. छत्रपती शिवरायांचा पराक्रम आणि भगवानबाबांची सात्विकता आणि मुंडे साहेबांचा संघर्ष हीच माझी ओळख असल्याचे मत भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले. मी थकणार नाही, थांबणार नाही आणि कधीही कोणासमोर झुकणार नाही असेही त्या म्हणाल्या. छत्रपती संभाजीराजेंचा आदर्श माझ्यासमोर आहे. त्यामुळं मी संघर्ष करत राहणार असल्याचे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. मी आता कोणताही अपेक्षा करणार नाही. मी आता 2024 च्या निवडणुकीच्या तयारीला लागली असल्याचे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. भगवान भक्तीगड सावरगाव इथे आयोजित करण्यात आलेल्या दसरा मेळाव्यात पंकजा मुंडे बोलत होत्या.**

माझे लोक म्हणजे समुद्र आहे. समुद्राला बांधणे शक्य नसल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. जर कोणी समाजात भिंती उभ्या करण्याचा प्रयत्न केला तर त्याला क्षमा करणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. लोकांना प्रेम नाही दिले तर खुर्च्या रिकाम्या राहतील. आता माझ्याकडे कोणतेही पद नाही. देवेंद्र फडणवीसांनी 2019 मध्ये महाजनादेश यात्रा काढली होती, त्यावेळी सभा घेण्यासाठी मी महाराष्ट्रभर फिरले. आता हे लोक माझी ताकद वाढवण्यासाठी आले आहेत. ज्या मुशीतून आमचे नेते आले त्याच मुशीतून मी आले आहे. आमच्यात व्यक्ती श्रेष्ठ नाही तर संघटन हेच श्रेष्ठ असल्याचे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

काळात प्रवाहाविरोधात ज्या पक्षात कुणीच जात नव्हते, त्या पक्षात गोपीनाथ मुंडे कमळाचे फुल हातात घेऊन आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत लढले. त्यांचा संघर्ष कमी झाला का? ४० वर्षांच्या राजकारणात केवळ साडेचार वर्षे सत्ता मिळाली. हा संघर्ष कमी आहे का? त्या गोपीनाथ मुंडेंचा संघर्ष आपल्यासमोर आहे, असेही पंकजा मुंडे यांनी म्हटले. व्यक्तीपेक्षा संघटन मोठे आहे, त्याच्यावर माझा संपूर्ण विश्वास आहे. संघटन व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. राजा असेल किंवा रंक सर्वांना हा नियम लागू आहे. माध्यमांनी यापुढे कोणत्याही आमदारकीच्या यादीत माझे नाव चालवू नये. 2024 ला पक्षाने तिकीट दिल तर तयारीला लागणार आहे. मला कोणत्याही नेत्याबद्दल काही बोलायचे नाही. आम्ही कमळाशिवाय दुसऱ्या बोटाला कधीही स्पर्श केला नाही, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. माझ्या नाराजीची चर्चा बंद करा, कोणीही नाराज नाही. कुणाचीही अवहेलना करू नका, कुणाचा अपमान करू नका. ही माझी इच्छा आहे. एवढे दिवस मी कधीच यावर बोलले नाही, मौन बाळगले. कारण माझा तसा स्वभाव नाही. मला गर्व नाही, मला स्वाभिमान आहे. माझ्या लेखी हा विषय संपला आहे. ज्यांना मंत्री करायचे ते करतील, आपण २०२४ च्या तयारीला लागले पाहिजे, असे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

### आता आमदारांची यादी आली तर माझं नाव घेऊ नका

आता आमदारांची यादी आली तर माझे नाव घेऊ नका, असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. मी कोणावरही नाराज नाही. मी का नाराज होऊ, असेही मुंडे यावेळी म्हणाल्या. मोठ्या मोठ्या लोकांना राजकारणात संघर्ष आला आहे. योग्य वेळेची वाट बघा असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. मी आता 2024 च्या तयारीला लागली आहे. मला कोणताही गर्व नाही, मी स्वाभिमानी आहे. मी तुम्हाला असत्य कधीही बोलणार नाही. सत्य कधीही पराजित होत नाही असेही त्या म्हणाल्या.

### मी कधीही कोणासमोर काही मागायला जाणार नाही

आता मी 2024 ला पक्षाने तिकीट दिले तर तयारीला लागणार आहे. मला कोणत्याही नेत्याबद्दल काही बोलायचे नाही. आम्ही कमळाशिवाय दुसऱ्या बटणाला कधीही स्पर्श केला नाही, हे सांगताना पंकजा भावनिक झाल्याचे पाहायला मिळालं. मी कधीही कोणासमोर काही मागायला जाणार नाही. मी कधीही उतणार नाही, मातणार नाही, आणि घेतला वसा टाकणार नाही. मी तुमच्यासोबत काम करणार आहे. आपण आपले काम करणार आहोत, आता पदाची अपेक्षा करु नका असेही मुंडे यावेळी म्हणाल्या.

# के. चंद्रशेखर राव राष्ट्रीय राजकारणात

आधुनिक केसरी न्यूज



**हैदराबाद :** तेलंगणा राष्ट्र समितीचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी आज दसऱ्याच्या मुहुर्तावर राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली आहे. 'तेलंगणा राष्ट्र समिती'ने राष्ट्रीय राजकारणात पाऊल ठेवल्यानंतर या पक्षाचे नामकरण 'भारत राष्ट्र समिती' असे करण्यात आले आहे. तेलंगणा भवनातील पक्षातील नेत्यांच्या बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली आहे. 'टीआरएस'चे 'भारत राष्ट्र समिती'मध्ये रुपांतर करण्याचा ठराव पक्षाच्या बैठकीत सर्वानुमते संमत करण्यात आला. केसीआर यांचा राष्ट्रीय राजकारणातील प्रवेश आगामी २०२४ च्या निवडणुकीचा दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. नामकरणानंतर पक्षाच्या झेंड्यावर असलेले कारचे चिन्ह कायम राहणार आहे. या झेंड्यावर भारताचा नकाशा असणार आहे, अशी माहिती तेलंगणाचे गृहमंत्री महमूद अली यांनी दिली आहे. तेलंगणा भवनातील या बैठकीला २८३ आमदार, खासदार आणि जिल्ह्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. ख्रिश्चन नेत्यांनी के. चंद्रशेखर राव यांना पाठिंबा जाहीर करत त्यांच्या राष्ट्रीय पदार्पणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. पक्षाच्या बैठकीत केसीआर यांना पाठिंबा दर्शवणारा प्रस्तावही उपस्थित नेत्यांनी संमत केला आहे. दरम्यान, "केसीआर यांचा राष्ट्रीय राजकारणातील प्रवेश गैरप्रकार असल्याचे म्हणत भाजपाने यावर टीका केली आहे. आपले सरकार आर्थिकदृष्ट्या चालवण्यासाठी राष्ट्रीय राजकारणात प्रवेशाची आखणी करणं अयोग्य आहे", असे तेलंगणा भाजपाचे मुख्य प्रवक्ते के. क्रिष्णा सागर राव यांनी म्हटले आहे. टीआरएसचे नाव बीआरएस केल्याने राष्ट्रीय पक्ष कसा बनू शकतो याचे मला आश्चर्य आहे. एखाद्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी विविध राज्यांमधील मतदारांचा पाठिंबा मिळवणे आवश्यक असते", असे राव म्हणाले आहेत.' 'तेलंगणा मॉडेल' प्रत्यक्षात नसून ती केवळ केसीआर यांच्या मनातील कल्पना असल्याची टीकाही राव यांनी केली आहे.

# अमित शहांवर मेहबुबा मुफ्ती संतापल्या

आधुनिक केसरी न्यूज



**श्रीनगर :** पिपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्याला श्रीनगरमधील घरी नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे. बारामुल्ला जिल्ह्यातील पट्टण येथे प्रवास करण्यापासून आपल्याला रोखण्यात आले असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तीन दिवसांच्या जम्मू काश्मीर दौऱ्यावर आहेत. याआधी श्रीनगरमध्ये त्यांनी बैठक घेत सुरक्षेचा आढावा घेतला. मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्या घराच्या गेटचा फोटो ट्वीट करत नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे. जम्मू काश्मीर पोलिसांनीही तात्काळ उत्तर देत त्यांच्यावर कोणतंही बंधन नसून, त्या हवे तिथे फिरु शकतात असे स्पष्ट केले. जम्मू काश्मीर पोलिसांनी केलेल्या ट्वीटनंतर मेहबुबा मुफ्ती यांनी त्यांचा दावा फेटाळला असून, ते खोटं बोलत असल्याचा आरोप केला आहे.


### मेहबुबा मुफ्तींचं ट्वीट काय?

गृहमंत्री जम्मू काश्मीरमध्ये सर्व काही सामान्य झालं असल्याचं ढोल बडवून सांगत आहेत. पण मला घरामध्ये नजरकैदेत ठेवण्यात आलं आहे. एका कार्यकर्त्याच्या लग्नासाठी मला पट्टणला जायचं होतं. जर एका माजी मुख्यमंत्र्यांचे मुलभूत अधिकार अशाप्रकारे काढून घेतले जात असतील, तर सर्वसामान्याचं काय होत असेल याचा विचार आपण करु शकतो," असं मुफ्ती मोहम्मद यांनी म्हटलं आहे.

अमित शाह यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी श्रीनगर आणि बारामुल्लादरम्यान ५० किमी हायवेवर निर्बंध लावले आहेत. वाहतुकीच्या मार्गातही बदल करण्यात आले आहेत.

### पोलिसांना फेटाळला दावा

पोलिसांनी मेहबुबा मुफ्ती यांचा दावा फेटाळत त्यांनीच आपला गेट बंद केला असल्याचं म्हटलं आहे. त्यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याचा दावा पोलिसांनी केला असून, सोबत गेटचा फोटोही शेअर केला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चांदणे तुझ्या स्मरणाचे ...

आधुनिक केसरी

कवी ग्रेस यांची एक सुंदर कविता आहे. ' भय इथले संपत नाही. ' लता मंगेशकरांनी ते फार सुंदर गायिले आहे. मी माझ्या आईच्या संदर्भात जेव्हा विचार करतो, तेव्हा मला यातील दोन ओळी आठवतात. त्यातील पहिली म्हणजे, ' तो बोल मंद हळवासा, आयुष्य स्पर्शुनी गेला ' आणि दुसरी ओळ म्हणजे ' हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणाचे...'

माझी आई म्हणजे प्रेम आणि वात्सल्याची मूर्तीच ! ती दिसायला जरी खूप सुंदर नव्हती तरी तिच्या व्यक्तिमत्वात एक जादू होती. तिने कोणतीही साडी नेसली, तरी ती तिला कमालीची शोभून दिसायची. तिचं वागणं, बोलणं याची छाप आपोआपच समोरच्या व्यक्तीवर पडायची. आमची परिस्थिती साधारण म्हणावी अशीच होती. तिच्या अंगावर फारसे दागिने नसायचे. पण जे काही मिळाले त्यात ती आनंदी असायची. तिचं वागणं, बोलणं आणि तिचं प्रेमळ हास्य हाच सगळ्यात मोठा दागिना होता ! तो तिला अत्यंत शोभून दिसायचा. माझी आई फार शिकलेली नव्हती. पण तिला लिहिता वाचता येई. तिच्या विचारांना मात्र आधुनिकतेचा स्पर्श होता. घरातील चालीरीती, परंपरा सांभाळताना त्याला आधुनिकतेची जोड तिने दिली. कोणत्याही गोष्टींना केवळ अंधश्रद्धा किंवा परंपरा म्हणून कवटाळून बसली नाही. त्याचबरोबर घरातल्या सगळ्यांची मने तिने जपली. त्या काळी आम्ही एका लहानशा खेड्यात राहत होतो. घरात आम्ही चार भावंडे. वडिलांचा स्वभाव सुरुवातीला काहीसा तापट होता. पण आई साऱ्यांशी जुळवून घेई. वडील गावाचे पोलीस पाटील होते. त्यामुळे सारं गाव तिला प्रेमाने आणि आदराने ' पाटलीणबाई ' अशी हाक मारायचं. तिने सांगितलेल्या दोन गोष्टी मला आयुष्यभर उपयोगी पडल्या. मला कधी कधी एखाद्या माणसाचा खूप राग यायचा. तो माणूस आपल्याबरोबर किंवा इतरांशी असे का वागतो हे कळायचे नाही. मग मी चिडून आईला विचारायचो. कोणतीही गोष्ट हक्काने विचारायचे माझे स्थान म्हणजे आई होते. त्या माणसाच्या वागण्याबाबत स्पष्टीकरण देताना आई म्हणायची, ' अरे, तो त्याच्या जागी बरोबर आहे. त्या माणसाचे चिडणे किंवा अमुक एक असे वागणे स्वाभाविक आहे. आपण त्याच्या जागी आहोत अशी कल्पना करावी. अशा परिस्थितीत आपण कसे वागलो असतो ? तसेच ना ! म्हणून जेव्हा जेव्हा दुसरी व्यक्ती अशी का वागते हा प्रश्न आपल्याला पडतो, तेव्हा तेव्हा आपण त्या व्यक्तीच्या जागी स्वतःला ठेवून पाहावे. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# अंतर्मन हेच प्रेमाचं प्रतिबिंब असावं

आधुनिक केसरी

आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातले सार कशांत आहे, हेही कळू शकते. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतेच असे नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलेही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो. प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असते असे नाही. आपले अंतर्मन हे खरे तर प्रेमाचे प्रतिबिंब असावे, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचे खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असते. प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणे जरुरीचे असते. जीवनाचे खरे सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेले असते. प्रेमासाठी तन अथवा धन नाही, तर मन महत्वाचे असते, ह्याची जाणीव सतत ठेवणे जरुरीचे असते.



आधुनिक केसरी

### तोचि स्थिरावला | ब्रह्मानंदी ||

**ज्याचे त्याचे भाग्य | लाभतो विलास ||**
**कोणाच्या वाट्यास | क्लेश येतो ||१||**

**कोणी विकारात | गुंते रात्रंदिन ||**
**तया कैसे भान | पाप-पुण्य ||२||**

**कर्म फळासाठी | आशेने राबतो ||**
**गुंतूनीया जातो | जन्मभर ||३||**

**मनाच्या मंदिरी | ज्याच्या वाजे टाळ ||**
**भाग्यवान बाळ | विठ्ठलाचा ||४||**

**जगाच्या बाजारी | विरक्त जगला ||**
**तोचि स्थिरावला | ब्रह्मानंदी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं चन्द्रहाससुशोभिते।**
**शस्त्रहस्ते नमस्तुभ्यं सिंहध्वजे नमोस्तुते।। ३८ ।।**
जिच्या हातामध्ये, चंद्रहास नावाची तलवार शोभून दिसते, अशा जगदंबिके, तुला नमस्कार असो. हातात शास्त्रे धारण करणारे, तुला नमस्कार असो. सिंह जिचे वाहन आहे, अशा तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं प्रसन्नवदने नमः।**
**सुहास्यवदने देवि त्वत् प्रसादाय काङ्क्षये।। ३९ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. हे प्रसन्नवदने तुला नमस्कार असो. हे सुहास्यवदने देवी, मी तुझ्या प्रसादाची कामना करतो.

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**बहू श्रापिता कष्टला अंबऋषी।**
**तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी।।११६।।**

**श्लोकार्थ :** विष्णूभक्त अंबरीश राजा दुर्वास ऋषींच्या शापामुळे फार कष्ट सोसू लागला, तेव्हा त्याला शापमुक्त करण्यासाठी भगवंताने गर्भवास पत्करला, तसेच उपमन्यू बाळाला क्षीरसागरही दिला.

विवेचन : इथून पुढील दहा श्लोक देव आणि भक्त यांचा महिमा सांगणारे आहेत. श्री समर्थ आपल्याला पुराणातील दाखले देऊन देव भक्ताचे रक्षण आणि पालन कसे करतो, ते समजावून सांगत आहेत. अंबरीष राजा एकदशीचे व्रत करीत असे. द्वादशीच्या उपवास सोडायच्या वेळेला दुर्वास ऋषी जेवावयास आले. पण स्नान करून येण्यास त्यांना उशीर झाला. द्वादशी संपायच्या आधी उपवास सोडणे गरजेचे होते, म्हणून अंबरीष राजाने दुर्वास ऋषी येण्याआधी उपवास सोडला. दुर्वास ऋषीना याचा राग आला. त्यांनी राजाला शाप दिला की काही जन्म प्राण्याचे आणि काही जन्म मनुष्याचे घ्यावे लागतील. आपल्या भक्तांवर आलेले संकट भगवंताने स्वतःवर घेतले. दुर्वासांच्या शापातून अंबरीष राजा मुक्त होण्यासाठी भगवंतानी जन्म घेतले, भक्तासाठी गर्भवास सोसला. एकादशी व्रता चे महात्म्य आपल्या घरातील ज्येष्ठ मंडळी सांगू शकतील.

पंढरीची वारी आहे माझे घरी।
आणी न करी तीर्थव्रत।। व्रत एकादशी करीन उपवाशी। गाईन अहर्निशी मुखी नाम।। नाम विठोबाचे घेईन मी वाचे। बीज कल्पांतींचे तुका म्हणे।।"*
(संत तुकाराम गाथा, अभंग क्र.२२४१, धार्मिक प्रकाशन संस्था)

दूसरी कथा उपमन्यू नावाच्या ऋषी पुत्राची. उपमन्यू हा व्याघ्रपाद ऋषींचा ज्येष्ठ पुत्र आणि धौम्य ऋषींचा वडील भाऊ. ते गरीब होते. त्याचे वडील अयाचित वृत्तीने राहत असत. (कोणाकडे काही न मागता जगायचे, कोणी दिलं तरच घ्यायचे. ) एकदा उपमन्यू आपल्या मामासोबत एका यज्ञ स्थानी गेला होता. तिथे त्याला गायीचे उत्तम दूध प्यायला मिळाले. तो घरी आला तेव्हा त्याने आईकडे दूध मागितले. घरी गाय नसल्याने त्याची समजूत काढावी, त्याचे मन मोडू नये, म्हणून नाईलाजाने त्याच्या आईने त्याला तांदळाच्या पिठाचे पाणी करून ते दूध म्हणून प्यायला दिले. खऱ्या दुधाची चव त्याला माहीत झाली होती. म्हणून त्याला ते आवडले नाही. त्याने आईला प्रश्न विचारला की आपल्याकडे गाय का नाही ? आई त्याला म्हणाली, आपण मागच्या जन्मात देवाची भक्ति केली नाही, म्हणून आपण गरीब आहोत, आपल्याकडे गाय घेण्या इतके पैसे नाहीत. उपमन्यू ध्रवाच्या निष्ठेने तपश्चर्या करू लागला. त्याने मोठी साधना केली. भगवान शंकर प्रसन्न झाले आणि त्यांनी त्याला दुधाचा सागर अर्थात क्षीरसागर भेट म्हणून दिला.

"भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला । संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ॥ १० ॥" (जुना दासबोध)


आपली श्रद्धा बळकट असेल आणि भक्ती शुद्ध असेल तर कल्पनेच्या बाहेरील गोष्टी घडू शकतात. आपण प्रयत्न करून पहावा.

**-दास चैतन्य, ८३८००१९६७६**

# अभिमानाची पूर्णाहुती हाच खरा यज्ञ

आधुनिक केसरी

पाण्याचा रंग कोणता म्हणून विचारले तर काय सांगता येईल? त्याचप्रमाणे भगवंत आहे. ज्याप्रमाणे पाहाल त्याप्रमाणे तो आपल्याला दिसेल. आपल्यामधल्या विकारांमुळे तो आपल्याला निराळा दिसू लागतो. खरोखर, भगवंताचे खरे स्वरूप जाणणारे विरळाच. ज्याचे विकार कमी, त्याला भगवंताची प्रचीती जास्त. एकच राम चोहोकडे कसा असेल, हे म्हणणे भ्रमाचे आहे. सर्व अवतार एक भगवंताचेच आहेत. नारायण हा लहानपणचा अवतार आहे, कारण तो सर्वांचा आदि आहे. राम हा तरुणपणचा अवतार आणि कृष्ण हा म्हातारपणचा अवतार समजावा. भगवंताला जन्ममरण नाही. तो तर सच्चिदानंद आहे; मग त्याचा जन्म कशाला करायचा असे काही जण विचारतात. एका घरामध्ये बाहेरच्या खोलीत पोरे दंगामस्ती आणि आरडाओरडा करीत होती. आजोबा घरात आहेत हे त्यांना माहीत नव्हते. आपण घरामध्ये आहोत ही जाणीव त्या पोरांना देण्यासाठी, खाकरा आला नसतानादेखील, आजोबा नुसते खाकरले. ते ऐकल्याबरोबर पोरे लगेच गप्प बसली. त्याचप्रमाणे भगवंताला जन्म नसूनसुद्धा 'तो आहे' ही जाणीव होण्यासाठी त्याचा जन्म करायचा



असतो. भगवंत आहे ही जाणीव झाल्यानंतर, आपण विषयामध्ये दंगामस्ती करणार नाही आणि तो बेताने भोगू.

मी जोवर साकारावर प्रेम करतो, तोवर भगवंतालाही आकार घेणे प्राप्त आहे. जे वेदांना शक्य झाले नाही, जिथे वेदांनी 'नेति नेति' केले, ते परमात्मस्वरूप संतांनी जाणले; म्हणून भगवंताला सगुणात आणले. हा आनंदस्वरूप परमात्मा मिळविण्यासाठी आज आपल्याला सगुणोपासनेची अत्यंत जरूरी आहे. माणसाला जे अत्यंत हितकारक असते, ते शांत आणि आनंदस्वरूप असले पाहिजे. सत्यस्वरूपाची प्राप्ती झाल्याशिवाय ते मिळत नाही; म्हणून भगवंताची प्राप्ती करून घ्यावी. विद्वत्ता अभिमान उत्पन्न करते; म्हणून विद्वत्ता आणि भगवंताची निष्ठा एके ठिकाणी सापडणे कठीण आहे. मीपणाची आणि अभिमानाची पूर्णाहुती देणे हाच खरा यज्ञ होय. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्त्विकता उत्पन्न होईल, आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे 'सर्वस्व' अर्पण करणे, हेच यज्ञाचे खरे सार होय.ज्याने स्वतःला ओळखले, त्याने भगवंताला ओळखले. विकारांच्या अधीन न होण्यामध्ये मनुष्याचे खरे मनुष्यपण आहे. भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय नुसती नीति ही पोरकी असते. ज्यात परमात्म्याचा विसर पडत नाही ती खरी चांगली बुद्धी आणि तो खरा सद्व्यवसाय. देवाचे नाम घ्यावे, नीतिधर्माचे आचरण करावे, प्रेमाने वागावे, आणि लोकांना मदत करावी, यालाच परमार्थ म्हणतात; आणि तो प्रत्येकाने मनापासून करावा.

आजचे बोधवचन : प्रपंचात जशी आसक्ति असते, तशीच रामचरणी ठेवणे, हीच रामभक्ति होय.

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# सरसंघचालक : लोकसंख्या वाढली की देशाची विभागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसंख्येला देशावरील ओझे न समजता मनुष्यबळ म्हणून पाहिले पाहिजे असे प्रतिपादन करतानाच संप्रदाय, पंथांच्या लोकसंख्येत असंतुलित वाढ झाली की देश तुटतो असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटले. संघाच्या दसरा मेळाव्यात संघ स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले. नागपूर येथे झालेल्या संघाच्या पांरपरिक दसरा मेळाव्यात त्यांनी मार्गदर्शन करताना सरकारचे कौतुकही केले आहे. आपल्या भाषणात मोहन भागवत यांनी म्हटले की, जितकी लोकसंख्या असेल तितका त्याचा ताण असेल हे खरे आहे. पण, तीच लोकसंख्या मनुष्यबळ म्हणून वापरली तर त्याचा उपयोग होऊ शकतो. कोणत्याही देशात तरुणांची लोकसंख्या 57 कोटी नाही. चीनदेखील आता वयस्कर झाला असून भारत त्यांच्या तुलनेत तरुण असल्याचे भागवत यांनी म्हटले. लोकसंख्या कमी झाली तर अनेक समाज आणि भाषा नष्ट होतात. त्याच वेळी, लोकसंख्या वाढ देखील संतुलित असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. लोकसंख्या वाढीचा असमतोल असेल, तर त्याचे काय परिणाम होतात, हे आपण 50 वर्षांपूर्वी अनुभवले आहे. लोकसंख्या वाढीत पंथ, संप्रदाय यांच्यातील देश तुटतो. त्यामुळे या असंतुलनाकडे लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सरसंघचालकांनी म्हटले. लोकसंख्या नियंत्रणाबाबत धोरण तयार करण्याची आवश्यकता असून कोणालाही यातून विशेष सवलत अथवा त्यांना वगळता कामा नये असेही सरसंघचालकांनी आपल्या भाषणात म्हटले.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटले की, काहीजणांकडून भारताची प्रगती होऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या घटकांकडून भारतातील सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सुरू असून भेदभाव वाढवण्याचा प्रयत्न होत आहे.

देशात दहशतवाद वाढावा, अराजकतेची स्थिती निर्माण आणि लोकांना कायद्याचा आदर वाटू नये अशा पद्धतीचे प्रयत्न सुरू आहेत. असे प्रयत्न कोण करतोय हे सांगण्याची आवश्यकता नाही. सरकारकडून अशा लोकांवर कारवाई सुरू असून आपण सरकारला सहकार्य करण्याची आवश्यकता असल्याचे भागवत यांनी आपल्या भाषणात म्हटले. आपल्या शैक्षणिक धोरणात उच्च




शिक्षणात मातृभाषेचा समावेश करण्यात येत आहे. त्यानुसार, आता पाठ्यक्रम पुस्तके आणि शिक्षकदेखील तयार होत आहे. पण, आपण आपल्या पाल्यांना मातृभाषेतील शिक्षणासाठी पाठवतो का, असा सवाल भागवत यांनी यावेळी केला.

करिअरसाठी इंग्रजीची आवश्यकता आहे, हे एक मिथक असून जर मातृभाषेतील शिक्षणासाठी आपण आपल्या मुलांना पाठवले नाही तर सरकारचे शैक्षणिक धोरण यशस्वी होऊ शकेल का, असेही त्यांनी म्हटले.

इंग्रजांनी भारतावर आपले शैक्षणिक धोरण लादले. त्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण घेऊन अनेक महापुरुषांनी इंग्रजांविरोधात संघर्ष केला. इंग्रजांविरोधात संघर्ष करण्याचा संस्कार त्यांना शैक्षणिक धोरणातून नव्हे तर समाज आणि कुटुंबातून मिळाले होते. त्यामुळे शिक्षणासोबत कुटुंब आणि समाजाचे संस्कारदेखील आवश्यक आहेत.

### सामाजिक समतेसाठी पुढाकार घ्या

मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात सामाजिक समतेचाही मुद्दा मांडला. भागवत यांनी म्हटले की, डॉ. आंबेडकर यांनी संविधानामुळे राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळतील. मात्र, सामाजिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करावे लागतील असे म्हटले होते. सामाजिक समानतेसाठी कायदे आहेत. मात्र, विषमता आपल्या मनात आहे. मनातील ही विषमता दूर सारण्याची आवश्यकता असून सगळ्यांनी त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे भागवत यांनी म्हटले. मंदिर, पाणवठा आणि स्मशानभूमी आदी सगळ्यांसाठी एकच असायला हवे, असे भागवत यांनी म्हटले.



# लष्कराचे चित्ता हेलिकॉप्टर कोसळले

## एक पायलट शहीद; दुसरा गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अरुणाचल प्रदेशातील तवांगजवळ भारतीय लष्कराचे चित्ता हेलिकॉप्टर कोसळले असून या अपघातात एक पायलट शहीद झाला असून दुसरा पायलट गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात आले. या अपघातानंतर भारतीय लष्करातील अधिकारी आणि सैनिक घटनास्थळी दाखल झाले असून आता तपास सुरु करण्यात आला आहे. या हेलिकॉप्टरमध्ये दोन पायलट होते, त्यापैकी एक पायलट लेफ्टनंट कर्नल सौरभ यादव हे शहीद झाले आहेत. तर त्याचवेळी दुसऱ्या पायलटला गंभीर अवस्थेत जवळच्या लष्करी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. भारतीय लष्कराचे हेलिकॉप्टर सकाळी नियमित उड्डाणासाठी रवाना झाल्याचे सांगण्यात येत आहे. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास हेलिकॉप्टर अचानक कोसळले. हा अपघात झाल्यानंतर दोन्हीही वैमानिकांना गंभीर अवस्थेत लष्कराच्या रुग्णालयामध्ये दाखल केले गेले होते. मात्र या अपघातातील लेफ्टनंट कर्नल सौरभ यादव शहीद झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या अपघातानंतर लष्करी अधिकाऱ्यांना हा अपघात कसा काय झाला असे विचारले असता त्याची माहिती अजून कळू शकली नसल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये देशातील पहिले सीडीएस जनरल बिपिन रावत यांचाही हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतर चीफ ऑफ डिफेन्स स्टाफचे पद ९ महिन्यांहून अधिक काळ रिक्त राहिले होते. नुकतेच निवृत्त लेफ्टनंट जनरल अनिल चौहान यांना देशाचे नवीन चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ बनवण्यात आले आहे. या अपघातानंतर लष्करातील अधिकारी आणि सैनिक घटनास्थळी दाखल झाले आहेत. या घटनेचा तपास सुरु असून जखमी अवस्थेत असलेल्या जवानावर सध्या उपचार सुरु आहेत.

# खासदार-आमदार देशासाठी कलंक

## संभाजी भिडेंची जहरी टीका

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** खासदार,आमदार आणि लोकप्रतिनिधी हे देशासाठी कलंक आहेत, अशा शब्दात शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी राजकीय पक्षाच्या नेत्यांवर जहरी टीका केली आहे. तसेच सर्वधर्म हा गांडुळ विचार असून तो इतिहासाला धरून नसल्याचे मतही भिडे यांनी व्यक्त केले. ते बुधवारी सांगलीत आयोजित करण्यात आलेल्या दुर्गामाता दौड समारोप प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी संभाजी भिडे यांनी आक्षेपार्ह शब्दांत राजकारण्यांवर टीका केली. भिडे गुरुजी यांनी खासदार,आमदार आणि लोकप्रतिनिधी देशाला लागलेले कलंक असल्याची टीका केली आहे. सर्वधर्म हा गांडूळ विचार आहे, हा सत्य विचार नसून असत्य विचार आहे,हा इतिहासाला धरून विचार नाही,असे मत व्यक्त करत आपल्या मातृभूमीसाठी जगणारी माणसं पाहीजे आहेत,पण इथेचं बोंब आहे. साधी गोष्ट घ्या,लोक निवडून देतात ,ते आमचे खासदार काय ? आमदार काय, लोकप्रतिनिधी काय ? शरम वाटत नाही. सगळेजण पगार घेतात,भाडोत्री. हे बेकार असून आपल्या लोकशाहीला आणि परंपरेला कलंक आहेत,अशा शब्दांत भिडे गुरुजी यांनी टीका केली.

सांगलीत नवरात्राच्या काळात दुर्गामाता दौडीच आयोजन करण्यात येते. हजारो धारकरी दौडीत सहभागी झाले होते. विजयादशमीच्या दिवशी रिवाजाप्रमाणे शिवप्रतिष्ठानच्या दुर्गामाता दौडीची सांगता झाली. संभाजी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या ३५ वर्षांपासून सांगलीत दुर्गामाता दौडीचे आयोजन केले जाते. कोरोनामुळे दोन वर्षे ही दौड होऊ शकली नव्हती. त्यामुळे यंदा शिवप्रतिष्ठानच्या दुर्गामाता दौडीचा सोहळा उत्साहात संपन्न झाला.



# शिवशंभू राजे संघटना सिल्लोड तालुका उपाध्यक्षपदी सागर राजे भोसले

आधुनिक केसरी न्यूज




**सिल्लोड :** शिवशंभू राजे संघटना महाराष्ट्र राज्य तालुका उपाध्यक्षपदी सागर राजे भोसले यांची निवड करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष महादेव पवार, संभाजी पाटील नांदेडकर, प्रवक्ते महाराष्ट्र राज्य (शिवव्याख्यते), छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष कैलास पाटील यांच्या नेत्वाखाली सदर नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल सूर्यप्रकाश पाटील मराठवाडा अध्यक्ष, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष कैलास भाऊ पवार, जिल्हा उपाध्यक्ष कैलास कराळे, प्रसिध्दी प्रमुख संतोष थोरात आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आधुनिक केसरीशी बोलताना सागर राजे भोसले यांनी सांगितले की, 6 नोव्हेंबर 2022 रोजी आयोजित वेताळगड, ता. सोयगाव येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले पद स्वीकारल्यानंतर सागर यांनी आधुनिक केसरी यांच्याशी संवाद साधताना माझ्यावर जी संघटनेने जिम्मेदारी टाकलेली आहे जो विश्वास दाखवला आहे त्याला तडा न जाऊ देता माझ्या हातून समाजकार्य व शिवकार्य करण्याचा मी प्रयत्न करीन संघटनेशी व वरिष्ठांशी एकनिष्ठ राहील संघटनेच्या सर्व पदाधिकारी व शिवभक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन सागर राजे भोसले यांनी केले.

# भाजप आमदाराच्या गाडीला अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. देवराव होळी यांच्या वाहनाचा अपघात झाला आहे. गडचिरोली येथून आरमोरी तालुकास्थानी दुर्गादेवी दर्शनासाठी जात असताना अपघात झाल्याचे समजतेय. येथील गाढवी नदीच्या पुलावर ऐन मधोमध दुचाकीस्वाराला वाचविताना गाडी ट्रकला धडकली, त्यामुळे भीषण अपघात झालाय. या अपघातामध्ये दुचाकीस्वार जखमी झाल्याचं समोर आले आहे. गाडीमधील एअर बॅग योग्य वेळी उघडल्याने आमदार डॉ. देवराव होळी आणि त्यांचे सहकारी सुखरूप वाचले. मात्र अपघातात दुचाकीस्वार गंभीर झाल्याचं समजतेय. अद्याप दुचाकीस्वाराचे नाव व वास्तव्य कळू शकलेले नाही. अपघात होताच डॉ. देवराव होळी यांनी रुग्णवाहिका बोलावून अपघातग्रस्त युवकाला मदत पोहोचवली. आरमोरी पोलीस ठाण्याचे पथक या घटनेचा अधिक तपास करत आहेत.


आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

## बुमराची खंत


आधुनिक केसरी

पाठीच्या दुखापतीमुळे ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला मुकावे लागण्याची मला खंत आहे. मात्र, या स्पर्धेदरम्यान भारतीय संघाला माझे पूर्ण समर्थन असेल, असे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा मंगळवारी म्हणाला. जायबंदी बुमरा ऑस्ट्रेलियात होणाऱ्या आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषकाला मुकणार असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोमवारी अधिकृतरीत्या जाहीर केले होते. बुमराची सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम गोलंदाजांमध्ये गणना केली जाते. त्यामुळे तो विश्वचषकात खेळू न शकणे भारतासाठी मोठा धक्का मानला जातो आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषकात खेळता येणार नसल्याची मला खंत आहे. मात्र, तुमच्या शुभेच्छा, तुम्ही दाखवलेली काळजी आणि दिलेले पाठबळ याबद्दल मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. आता दुखापतीतून सावरतानाच मी भारतीय संघाला समर्थन दर्शवत राहीन, असे बुमराने 'ट्वीट'मध्ये लिहिले. पाठीच्या दुखापतीमुळेच बुमराला गेल्या महिन्यात झालेल्या आशिया चषक स्पर्धेलाही मुकावे लागले. बुमरा ट्वेन्टी-२० विश्वचषकात खेळणार नसल्याचे जाहीर करण्यात आले असले, तरी भारतीय संघात त्याची जागा कोण घेणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. नुकताच करोनामुक्त झालेला मोहम्मद शमी आणि दीपक चहर या वेगवान गोलंदाजांची भारतीय संघात राखीव खेळाडू म्हणून निवड झाली आहे. या दोघांसह मोहम्मद सिराजबाबत निवड समिती सध्या विचार करत असल्याची माहिती आहे. १६ ऑक्टोबरपासून ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या प्राथमिक फेरीला सुरुवात होणार असून 'अव्वल १२' फेरीचे सामने २२ ऑक्टोबरपासून होतील. भारताचा सलामीचा सामना २३ ऑक्टोबरला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी नितिन मेनन पंच दुबई : ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी १६ पंचांची यादी मंगळवारी जाहीर करण्यात आली आणि यात भारताच्या नितिन मेनन यांचाही समावेश होता. 'आयसीसी'च्या विशेष पंच श्रेणीतील (एलिट पॅनल) एकमेव भारतीय पंच असलेले मेनन ऑस्ट्रेलियात दाखल झाले आहेत. १६ ऑक्टोबरला श्रीलंका आणि नामिबिया यांच्यात होणाऱ्या सलामीच्या लढतीत जोएल विल्सन आणि रॉड टकर हे पंचांची भूमिका बजावतील. या स्पर्धेसाठी अँडी पायक्रॉफ्ट, ख्रिस ब्रॉड, डेव्हिड बून आणि रंजन मदूगले यांची सामनाधिकारी म्हणून निवड झाली आहे.




## नगरचा गंज बाजार

आधुनिक केसरी



विश्वास सोहोनी
मो. 9850995652

**आपण आपल्या डोळ्यासमोर आठवणी आणतो. त्यास आपण आपला स्मृती गंध म्हणून समजतो. अशा अनेक आठवणी आपल्या मनात असतात की त्या आठवणीवर आपण आनंदाने जगत असतो. या आठवणींना उजाळा देऊन या आठवणी कोणी ऐकणारे असेल तर त्यांच्या बरोबर आपण शेअर करत असतो. आपला भूतकाळ म्हणजे आपल्या आठवणी. आपण जिथे वाढलो, शिकलो,खेळलो, मोठे झालो, रमलो टगेगिरी केली. अशा जागांविषयी या आठवणी निगडीत असतात. आपण ज्या शहरात रहायचो त्या शहरातील या आठवणी असतात. आता हेच बघा ना! मला आता नगर सोडून चाळीस वर्षे झाली परंतु काही रम्य आठवणी आज ही मनात आहेत.**

आमच्या घरा पासून गंजबाजार अगदी पाच मिनिटांच्या अंतरावर आहे.
अरे! कोथिंबीर संपली आहे!
जा पळत जाऊन घेऊन ये!
असे सांगितले व चार आणे हातात ठेवले की मी खरच पळत जाऊन कोथिंबीर घेऊन यायचो. कारण त्या काळात चार अण्यात पाच दहा पैसे परत यायचे तो आमचा पाकेट मनी असायचा. परदेशीगल्लीच्या बोळीतून बाहेर आलं की उजव्या हाताने सरळ गंज बाजार गाठायचा. गंजबाजारातील रस्ते इतके लहान होते की समोरासमोरच्या दुकानातील मालक गल्ल्यावर बसून गप्पा मारत असत तर काहीजण दुकानाबाहेर बसून गप्पा मारत असत. खिस्त गल्लीच्या कोपऱ्यावरुन आपण पुढे गेलं की डाव्या हाताला आत वळायचे या चौकात जामगावकर क्लाथ स्टोअर ,नवा मराठा,शहा ब्रदर्स दो-यावाले बोरा,अबेउद्दीन पेंटवाले अशी छोटी मोठी दुकाने समोर यायची. धावडेंच्या किराणा दुकानावरुन थोडं पुढं गेलं की उजव्या हाताला दगडी रस्ता आहे व शेजारीच गंज बाजारातील प्रसिद्ध भाजी मार्केट (मंडई) महात्मा ज्योतिबा फुले भाजी मार्केट आहे याला भाजी बाजार ही म्हणायची पद्धत आहे. छोट्या रस्त्याने पुढे गेलं की हे भव्य भाजी मार्केट आपल्या नजरेस पडते.
या गंज बाजारात आत आल्यावर इतकी भव्य भाजी मंडई असेल यांची कल्पना सुद्धा आपणास येत नाही. आम्ही या भागाला गंज असे म्हणायचो.
जा रे ! गंजातून पानं घेऊन ये!
त्या काळात चितळेरोड वरील नेहरू मार्केट, गंज बाजारातील भाजी मार्केट,माळीवाडा, अशा दोन तीन ठिकाणी भाजी मिळायची या गंजबाजारात सकाळी आजूबाजूच्या खेड्यातून ताजा व गावराण भाजीपाला यायचा.
महात्मा फुले मार्केटची भव्यता आज ही डोळ्या समोर आहे. मार्केटच्या चारही बाजूस सहा दरवाजे ते ही फिरते. तसेच या शेडची भरपूर उंची पण आपल्या लक्षात येते. भाजी विकण्यासाठी लांबलचक मोठे दगडी ओटे. मंडईच्या मध्यावर दर्शनी भागात महात्मा ज्योतिबा फुले यांचा रंगीत पुतळा. तसेच मागच्या बाजूस भाजी लिलाव कराण्यासाठी जागा होती. सगळ्यात शेवटी उजव्या कोपऱ्यात स्वच्छतागृह, पाणी अशा सर्व सोयीया मार्केटमधे उपलब्ध होत्या. ही मंडई बघायची असेल तर सकाळी सकाळीच तिथं जायला पाहिजे. आजूबाजूच्या खेड्यातून आलेला माल उतवरुन घेण्याची लगबग, आलेला माल मागच्या बाजूला लिलावासाठी ओट्यावर रचणे व तिथेच ओट्यावर उभे राहून प्रत्येक वाणाचा लिलाव करणे हे या मंडईची वैशिष्ट्य होती.
त्या काळात बबनराव मिस्कीन हे बडे आडते या मंडईत होते तसेच या मंडईत रामदास दळवी नावाचे गृहस्थलिलाव करण्यात प्रसिध्द होते. त्यांची लिलाव करण्याची खास पद्धत होती त्यामुळे ते बाजारात लिलाव वाले दळवी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्याकडे माल गेला की त्याला मालाला योग्य भाव मिळण्याची खात्री शेतकऱ्यांना असायची.
बाहेरच्या बाजूस कर्तारसिंग पंजाबी लिंबूवाला बसलेला असायचा त्यांचा स्वभाव फार प्रेमळ होता तसेच तो फुटबालचा शौकीन होता. याच भागात पमनदास आहुजा हे मोठे फ्रुट मर्चंट होते तसेच गफूरभाई,मेहबूबभाई हे भाजीचे व्यापारी सुद्धा गंजात प्रसिद्ध होते. नटबोल्डने तयार केलेलीमंडईची भव्य शेड आजही शाबूत आहे. शेडच्या डाव्या बाजूने आपण आत गेलं की ओट्यावर हिरवी चादर पसरल्या सारखी दिसायची. ताजा व फ्रेश हिरवा भाजीपाला छान पैकी ओट्यावर मांडून ठेवलेला असायचा. त्या काळात हायब्रीड हा प्रकारच नव्हता जो माल येईल तो गावराण असायचा. नुसता पाण्यात बुडवून गड्डीला एक झटका मारला की ती गड्डी एकदम फ्रेश दिसायची व लगेच घ्यावीशी वाटायची. ओट्यावर बसलेले भाजी विक्रीते आपल्या विशिष्ट लईत आवाज देऊन भाजी विकायचे.
उजव्या बाजूला फळभाज्या,वेलवर्गीय भाज्या मस्त मांडलेल्या असायच्या. डाव्या बाजूने आत जायचे व भाज्या बघत बघत उजव्या बाजूने सर्व भाज्या बघून भरलेली भाज्यांची पिशवी घेऊन बाहेर पडायचे. ही मंडई इतकी मोठी होती की तिला सहा




ठिकाणाहून एन्ट्री होती पुढे मागे व मध्यभागातून या मंडईत सहज जाता यायचे. डाव्या बाजूस पसारेवाले व किराणाची दुकाने होती उजव्या बाजूस बि बियाणेंची दुकाने होती व मंडईच्या मागच्या बाजूस सोने घटाईची दुकाने होती. या मंडईत जाण्या येण्यासाठी पुढे मागे मागच्या बाजूने व मधुन चारपाच रस्ते होते त्यामुळे मंडईत अगदी सहज पोहचता यायचे. तसेच डाव्याबाजूस फ्रुट मार्केट ही होते. त्या काळात ते फक्त आम्ही बघून यायचो. आमची फळं म्हणजे बोरं, केळी, आवळे, चिंचा, पेरु अशी असायची.
सफरचंद हे फक्त बघण्यासाठी असायचे.
सकाळी लवकर मंडईत गेलं की तिथं मिलटरीच्या गाड्या आलेल्या असायच्या. त्यांचे आफीसर सब्जी ठेकेदारा मार्फत यादी प्रमाणे होलसेल मधे माल खरेदी करायचे. त्यांचे जवान खरेदी केलेला भाजीपाला गाडीत भरायचे व सकाळी नऊच्या आत परत जायचे. तशी मंडई नगर शहराच्या मध्यभागी होती.या मंडईच्या आजूबाजूला सर्व उपयुक्त मार्केट असायची. त्यामुळे घरात एखादा कार्यक्रम किंवा पुजा असली की अगदी विड्याच्या पानां पासून ते भाजीपाला, किराणा माल, पूजा साहीत्य हे सर्व एकाच ठिकाणी मिळायचे त्यामुळे काळजी नसायची. त्यातून एखादी वस्तू विसरली तरी पटकन जाऊन आणता येत असे.
या मंडईत मराठा, माळी, मुस्लीम व सिंधी समाजाची दुकाने असायची. सिंधी समामातील व्यापारी मागील भागातील ओट्यावर कांदा बटाटा लसून यांची ठोक व किरकोळ विक्री करायचे. हे सर्व समाज मंडईत सर्व प्रकारची भाजी विकत असत.
या मंडईत बुधवारी व रविवारी जास्त गर्दी असायची. बुधवारी व्यापारी मंडळी खरेदीला यायची व रविवारी इतर मंडळी सुटी असल्यामुळे मंडईत येत असे. त्या काळात मंडईत येणाऱ्या ग्राहकांचे भाजी घेण्याचे ठिकाणं ठरलेली असायचे. त्यामुळे कोणत्या ग्राहकांना कोणती भाजी लागते हे भाजीवाल्याला माहिती असायचे. काही जण अडव्हासमधे आपल्याला पाहिजे असलेली भाजी आणायला सांगायचे.
आंब्याच्या सिझनमधे रायवळ आंबा या मंडईत भरपूरयायचा. सिंधी व्यापारी ते आंबे विकायचे. भाव ठरला की आपण पिशवीपुढे करायाची. तो व्यापारी एक! एक! एक!, दो!दो!दो! म्हणत दोन तीन डझन आंबे पिशवीत टाकायचा. ले लो! सस्ता हैं! म्हणत अजुन डझनभर परत पिशवीत टाकायचा. आपण आदराणिय नवनीतभाई बार्शीकर यांना धन्यवाद दिले पाहिजे की त्यानी पन्नास साठ वर्षापूर्वी इतकी भव्य व सुंदर मंडई या भागात बांधली. माझ्या मते ही भाजी मंडई त्या काळात नगरमधील महत्त्वाचा लन्डमार्क समजला जायचा. अशी सुंदर विविध लोकांनी बहरलेली भाजी मंडई आज ही पन्नास वर्षांनंतर जशीच्या तशी डोळ्या समोर उभी आहे. तसेच त्याकाळातील मैत्रीचे संबंध असलेले भाजी विक्रेतेही आठवतात व खूप बरे वाटते. आपण संध्याकाळी भाजी आणायला गेलं की लालूची पाणीपुरी व दही वडा ठरलेला असायचा. ती चव आज ही जिभेवर आहे, क्या बात हैं!
याच भागात भुमकर, कांकरिया, कटारिया, जामगांवकर, मनवेलीकर, भोवरी यांची दुकाने व घरे होती. त्यामुळे तिथे थांबूनगाठीभेटी व्हायच्या गप्पा व्हायच्या. खूप छान होते ते दिवस.
अजुन एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या काळात भाजी ही कापडाच्या मोठ्या पिशवीतूनच आणली जायची प्लॅस्टिक पिशव्या ह्या नव्हत्याच हे आवर्जून सांगावेसे वाटते. खचाखच भाजीने भरलेले ओटे व अगदी रुपया दोन रुपयात भरपूर मिळणारी भाजी आठवली की गेले ते दिवस व राहिल्या त्या आठवणी असेच म्हणावेसे वाटते. आता मार्केट यार्ड झाल्यामुळे या मंडईची मजा पूर्वीसारखी राहिलेली नाही असे एका मित्राने सांगितले. यालाच म्हणतात काळाचा महिमा. ज्यांनी या मंडईत जाऊन भाजी खरेदी करण्याचा आनंद ज्यांनी घेतला आहे ते नगरकर माझ्या मते भाग्यवान आहेत. कारण पन्नास वषापूर्वीआपल्याच गावातील भाजी मंडईत ताजी भाजी खरेदी करण्याचा आनंद घेण्याची मजा काही औरच होती हेच खरे. रम्य ते नगर, रम्य त्या नगरच्या आठवणी!

## नरेंद्र मोदींचा जागतिक पातळीवरील दबदबा

आधुनिक केसरी

**शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) २२वी वार्षिक परिषदेच्या निमित्ताने नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांची भेट झाली होती. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर पहिल्यांदाच दोन्ही नेत्यांची प्रत्यक्ष भेट झाली. यावेळी द्विपक्षीय चर्चेत मोदींनी युक्रेन युद्धाबाबत चिंता व्यक्त केली. 'ही युद्धाची वेळ नव्हे', असा सल्लाही त्यांनी दिला होता. "अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्याचे आव्हान सध्या जगासमोर आहे. करोना महासाथ आणि युक्रेनमधील संघर्षांमुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. परिणामी, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा संकट निर्माण झाले आहे. त्यासाठी लवचीक पुरवठा साखळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असं मोदींनी सांगितलं होतं.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना 'ही युद्धाची वेळ नव्हे' असा सल्ला दिल्यानंतर जगभरातून त्यांना पाठिंबा मिळत आहे. त्यातच आता युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लोदिमिर झेलेन्स्की यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहेत. व्लोदिमिर झेलेन्स्की आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोनवरुन एकमेकांशी संवाद साधला. यावेळी नरेंद्र मोदींनी पुन्हा एकदा संघर्षांवर संवादातून मार्ग काढण्याची गरज अधोरेखित केली. युक्रेनची अखंडता कायम राखण्यासाठी दिलेल्या पाठिंब्यासाठी झेलेन्स्की यांनी मोदींचे आभार मानले. तसंच युद्धासाठी ही योग्य वेळ नसल्याचं या मोदींच्या वक्तव्याचं महत्त्वही सांगितलं. दरम्यान 'युक्रेन संघर्षांवर लष्करी मार्गाने कोणताही तोडगा निघू शकणार नाही. या संघर्षांमुळे युक्रेनमधील अणुऊर्जा प्रकल्प धोक्यात आले आहेत. याचे भयंकर दुष्परिणाम होऊ शकतात,'' अशी चिंता पंतप्रधान मोदींनी मंगळवारी व्यक्त केली.
पंतप्रधान कार्यालयाने प्रसृत केलेल्या निवेदनानुसार, या दूरध्वनी संभाषणात मोदी व झेलेन्स्की यांनी युक्रेनमधील संघर्षांवर चर्चा केली. हे युद्ध व तणाव लवकरात लवकर संपवण्याची गरज आहे. त्यासाठी संवाद व मुत्सद्देगिरीचा मार्ग अवलंबण्याची आवश्यकता असल्याचे मोदींनी या वेळी सांगितले.
युक्रेनने गेल्या आठवडयात रशियाने सार्वमत घेऊन ताबा मिळवलेल्या चारपैकी दोन प्रांतात लक्षणीय आगेकूच केली आहे. युक्रेनसह पाश्चात्त्य देशांनी व अमेरिकेने या युक्रेनच्या डोनेस्क, लुहान्स्क, खेरसन आणि झोपोरीझिया चार प्रांतांत रशियाने



घेतलेले सार्वमत अवैध ठरवून नाकारले आहे. हे सार्वमत जबरदस्तीने घेतल्याने बेकायदेशीर आहे, असे युक्रेनचे म्हणणे आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी रशियाची राजधानी मॉस्कोच्या लाल चौकातील सोहळयात या प्रांतांचे विलीनीकरण जाहीर केले होते.
शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) २२वी वार्षिक परिषदेच्या निमित्ताने नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांची भेट झाली होती. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर पहिल्यांदाच दोन्ही नेत्यांची प्रत्यक्ष भेट झाली. यावेळी द्विपक्षीय चर्चेत मोदींनी युक्रेन युद्धाबाबत चिंता व्यक्त केली. 'ही युद्धाची वेळ नव्हे', असा सल्लाही त्यांनी दिला होता.
"अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्याचे आव्हान सध्या जगासमोर आहे. करोना महासाथ आणि युक्रेनमधील संघर्षांमुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. परिणामी, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा संकट निर्माण झाले आहे. त्यासाठी लवचीक पुरवठा साखळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उत्तम संपर्क यंत्रणा आणि देशादेशांतील परस्पर आयात-निर्यातीची प्रक्रियाही सुलभ करणे महत्त्वाचे आहे," असं मोदींनी सांगितलं होतं. "युद्धाबाबतची तुमची (मोदी) चिंता मी समजू शकतो. युद्ध लवकरात लवकर संपवण्याची आमचीही इच्छा आहे. मात्र युक्रेनने चर्चेत रस दाखवलेला नाही," असं पुतीन म्हणाले होते.

**-राजेश भोसले, मुंबई**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# माधुरीने घेतले आलिशान घर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बॉलिवूडची धक धक गर्ल माधुरी दीक्षितने मुंबईत वरळीमध्ये एक आलिशान घर खरेदी केले आहे. सध्या या घराबद्दल खूप चर्चा सुरू आहे. माधुरी आणि डॉ. श्रीराम नेने यांनी हे घर सुपर प्रीमियम रेजिडेंशियल प्रोजेक्ट इंडियाबुल्स ब्लू इथे खरेदी केले आहे. हे घर म्हणजे अगदी स्वप्नवतच आहे. घरातून समुद्राचा नजारा दिसतो. माधुरी दीक्षितने हे घर ४८ कोटी रुपयांना खरेदी केलंय. प्रति स्क्वेअर फूट या घराची किंमत ९० हजार रुपये आहे. या वर्षातला हा सर्वात महागडा व्यवहार मानला जातोय. ही एरिया पॉश समजली जाते. इथे सगळ्या सुख-सोयी आहेत. माधुरी दीक्षितचं हे नवं घर ५,३८४ स्क्वेअर फूट आहे. इंडियाबुल्स ब्लू या टॉवरमध्ये ५३ व्या मजल्यावर हा राजमहल आहे. घराबरोबर सात कार्ससाठीचं पार्किंग आहे. काही दिवसांपूर्वी माधुरीने याच टॉवरमध्ये भाड्यावर घर घेतले होतं. त्याचे भाडे दर महिना १२ लाख रुपये होते. ते साडे पात हजार स्क्वेअर फीट होते. अपूर्वा श्रॉफनं ते डिझाइन केले होते.

माधुरी दीक्षितचे एक घर हरियाणात होते. २०१९ मध्ये तिने ते विकले. ते घर ३.२५ कोटी रुपयांना विकले गेले. १९९६ मध्ये तेव्हाचे मुख्यमंत्री चौधरी भजनलाल यांनी मुख्यमंत्री कोट्यातून हे घर दिले होते. माधुरीच्या डॉक्टर पतीकडे अनेक लक्झरी कार्स आहेत. खूप संपत्तीही आहे. माधुरी एका सिनेमासाठी ४ ते ५ कोटी रुपये घेते आणि रिॲलिटी शोसाठी २५ कोटी रुपये.







# तेजस्विनी घेऊन आलीय शापित कुटुंबाची कथा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्लॅनेट मराठी ओटीटीवर निरनिराळ्या वेब सिरिज येत असतात. लवकरच अथांग ही सीरिज येत आहे. आज तिचा टीझर प्रदर्शित झालाय. याची निर्मिती अभिनेत्री तेजस्विनी पंडितने संतोष खेरसोबत केली आहे. अथांगचे दिग्दर्शन जयंत पवार यांनी केलंय. आज या वेब सीरिजचा टीझर समोर आलाय. तेजस्विनी पंडितनं तो तिच्या सोशल मीडियावर शेअर केला आहे. तिने लिहिले आहे, युगायुगांच्या वारुळातुनी क्षणाक्षणांची रांग, मनामनांचे डोह काजळी, दरियाहून 'अथांग'! अक्षय बर्दापूरकर प्रस्तुत, तेजस्विनी पंडित, संतोष खेर निर्मित 'अथांग'मध्ये संदीप खरे, निवेदिता जोशी सराफ, भाग्यश्री मिलिंद, उर्मिला कोठारे, ऋतुजा बागवे, दीपक कदम, ओमप्रकाश शिंदे, केतकी नारायण, शशांक शेंडे, योगिनी चोक, रसिका वखारकर आणि धैर्य घोलप या कलाकारांची फौज झळकणार आहे.

# सीतेला नाही आवडले VFX

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आदिपुरुष या चित्रपटावरून बराच वाद झाला आहे. या चित्रपटात सैफ अली खान 'रावण'च्या भूमिकेत दिसणार आहे. अशा परिस्थितीत अखिल भारत महाहिंदू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी चक्रपाणी महाराज यांनी चित्रपटातील सैफ अली खानच्या लूकचा निषेध केला. चाहत्यांनाही हा टीझर फारसा आवडला नाही. २ ऑक्टोबर रोजी या चित्रपटाचा टीझर अयोध्येत रिलीज करण्यात आला होता, त्यानंतर सोशल मीडियावर चित्रपटात दाखवण्यात आलेल्या व्हीएफएक्स आणि सैफ अली खान रावणाच्या भूमिकेत असल्याने चाहते प्रचंड संतापले.

आता 'आदिपुरुष'च्या टीझरवर 'रामायण' मालिकेतील सीता उर्फ अभिनेत्री दीपिका चिखलिया यांनी आपले मत दिले आहे. दीपिका यांना सिनेमाचे VFX फारसे आवडले नाही. सिनेमाचे दिग्दर्शन ओम राऊतने केलं असून यात 'रामायण'ची कथा दाखवण्यात आली आहे. दीपिका चिखलिया म्हणाल्या की, 'मी नुकताच आदिपुरुषचा टीझर पाहिला आणि मला वाटते की रामायणाची कथा जी सत्य कथा आहे आणि सात्त्विकतेची कथा आहे. मला रामायणाचा व्हीएफएक्सशी संबंध जोडणे योग्य वाटले नाही. हा माझा वैयक्तिक निर्णय आहे. चित्रपटात हनुमानजींनी चामडे कसे घातले आहे याबद्दल लोक बोलत आहेत आणि मला टीझरमध्ये इतके स्पष्टपणे काहीही दिसले नाही, जर तसे असेल तर मला वाटते की वाल्मिकीजी आणि तुलसीजींनी ज्या सत्यासह कथा पुस्तक लिहिली आहे, ते असू नये. त्याच्याशी छेडछाड केली आहे. मला वाटते की आपण ते राखले पाहिजे, कारण तो आपल्या देशाचा वारसा आहे.' 'महाभारत' फेम नितीश भारद्वाज यांनीही 'आदिपुरुष'च्या टीझरचा आढावा घेतला. या ऐतिहासिक मालिकेत त्यांनी भगवान कृष्णाची भूमिका साकारली होती. यामध्ये नितीश भारद्वाज म्हणाले, 'आदिपुरुष चित्रपटाचा टीझर पाहिला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रपट निर्माते चित्रपटाला कशी वेगळी आणि चांगली दृष्टी देत आहेत हे पाहून बरे वाटले. आमच्या साधूंनी 'रामायण' आणि 'महाभारत' केले आहेत. हे पाहून मला खूप आनंद झाला. मला टीझर आवडला, आशा आहे की प्रेक्षकांनाही हा चित्रपट आवडेल. मी ओम राऊत यांचे अभिनंदन करतो. हा चित्रपट पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.'





# 'पोन्नियिन सेल्वन'ने मोडला 'बाहुबली २'चा रेकॉर्ड

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कल्की कृष्णमूर्ती यांनी लिहिलेली 'पोन्नियिन सेल्वन' ही पाच भागांची कादंबरी तमिळनाडूमध्ये फार लोकप्रिय आहे. या कादंबरीमध्ये त्यांनी चोला साम्राज्याचा इतिहास रंजक पद्धतीने लिहिला आहे. सर्वप्रथम एम. जी. रामचंद्रन यांनी या कादंबरीवर आधारित चित्रपट तयार करण्याचा प्रयत्न केला. मणी रत्नम यांनी त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीला कमल हासन यांच्यासह हा चित्रपट बनवण्याचा निर्धार केला होता.

३० सप्टेंबर रोजी मणी रत्नम यांचा 'पोन्नियिन सेल्वन' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटाची बॉक्स ऑफिसवरची यशस्वी घोडदौड सुरु आहे. प्रदर्शनानंतर पाचव्या दिवशी या चित्रपटाने २७.५ कोटी रुपयांचा गल्ला केला आहे. आतापर्यंत या चित्रपटाने १६५ कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे. वीकेंडनंतर लगेचच आलेल्या दसऱ्याच्या सुट्टीचा फायदा या चित्रपटाला होऊ शकतो अशी शक्यता वर्तवली जात आहे. पिंकव्हिलाच्या वृत्तानुसार, पोन्नियिन सेल्वनचे एका आठवड्याचे बॉक्स ऑफिस कलेक्शन २०५-२१० कोटी रुपये इतके होऊ शकते.



# सैफने पुन्हा केली तीच चूक; 'तान्हाजी'त घडलेला प्रकार 'आदिपुरुष'मध्ये सुधारण्यात अपयश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सैफ अली खानने ओम राऊत दिग्दर्शित तानाजी- द अनसंग वॉरिअर सिनेमात काम केले होते. या सिनेमातील त्याच्या अभिनयाचे जेवढं कौतुक झाले तेवढीच त्याच्या भूमिकेवर अनेकांनी टीकाही केली. विशेष म्हणजे सैफने स्वतः या सिनेमावर इतिहासाशी छेडछाड केल्याचा आरोप केला होता.

अनुपमा चोप्रा यांना दिलेल्या मुलाखतीत या चित्रपटातील व्यक्तिरेखेबद्दल सांगितले की, उदयभान राठोडचे पात्र अतिशय आकर्षक होते, त्यामुळे ते सोडू शकत नव्हते, परंतु त्यात राजकीय कथन बदलले आहे आणि ते धोकादायक आहे. त्याचवेळी सैफनेही कबूल केले की, 'काही कारणास्तव मी भूमिका घेऊ शकलो नाही, कदाचित पुढच्या वेळी मी तसे करेन. मला हे पात्र अतिशय आकर्षक वाटल्यामुळे मी त्याबद्दल खूप उत्सुक होतो. पण हा इतिहास नाही. इतिहास म्हणजे काय हे मला चांगलं माहीत आहे. अनुपमा चोप्रा यांना दिलेल्या मुलाखतीत चित्रपटातील व्यक्तिरेखेबद्दल बोलताना सैफ म्हणाला होता की, उदयभान राठोडचे पात्र अतिशय आकर्षक होते, त्यामुळे ते सोडू शकलो नाही. परंतु त्यात राजकीय अजेंड्यामुळे अनेक बदल केले गेले आणि ते धोकादायक आहे.' त्याचवेळी सैफने हेही मान्य केले होते की, 'काही कारणास्तव मी यावर माझी ठामपणे भूमिका घेऊ शकलो नाही, कदाचित पुढच्या वेळी मी तसे करेन. मला हे पात्र अतिशय आकर्षक वाटल्यामुळे मी त्याबद्दल खूप उत्सुक होतो. पण हा इतिहास नाही. इतिहास काय हे मला चांगले माहीत आहे.'



# 'चाणक्य'च्या पोस्टरची सर्वत्र चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील राजकारणात गेल्या आठ वर्षात खूप उलथापालथ झाली आहे. आता याच राजकीय नाट्याचा थरार आगामी 'चाणक्य' या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. येत्या २०२३ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्रातील राजकीय महानाट्यांचा हा वास्तवदर्शी चरित्रपट आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

नुकतंच दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर या चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित केले आहे. या पोस्टरवर सभेसाठी जमलेल्या प्रचंड मोठ्या जनसमुदायासमोर भाषण करणारा एक नेता दाखवण्यात आला आहे. तर त्याच्या पाठीत खुपसलेला खंजीर हे दृश्य चित्रपटाच्या पोस्टरवर दिसत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांतील राजकारणातील थरारनाट्य "चाणक्य" चित्रपटातून उलगडणार असल्याचं स्पष्ट होतं. या चित्रपटाच्या पोस्टरमुळे चित्रपटाविषयी प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. राजकीय क्षेत्रातही अनेक अंदाज बांधले जाऊ लागले आहेत.





राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त निर्माते निलेश नवलाखा यांनी या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. निलेश नवलाखा यांनी मराठी चित्रपटांना वास्तवाजवळ नेऊन चित्रपटसृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. अनेक दर्जेदार चित्रपटांची निर्मिती केल्यानंतर ते आता स्वतः लेखन आणि दिग्दर्शनाकडे वळले आहेत. पहिल्याच चित्रपटासाठी त्यांनी महाराष्ट्रातलं राजकारण या ताज्या आणि सामान्य माणसांच्या कल्पनेपलीकडील उलथापालथींना भरलेल्या धारदार अशा 'पोलिटिकल थ्रिलर' विषयाची निवड केली आहे.

# मानवी विकासासाठी सुदृढ आरोग्य, सकारात्मक विचारांची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध भ्रामक कल्पनेत अडकून मानवामध्ये अनेक वेगवेगळे संभ्रम निर्माण होत आहेत. या संभ्रमातून मानवाला बाहेर काढून त्यांना ज्ञान, कौशल्यावर आधारित, आरोग्यविषयक तसेच मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या सक्षम व सुदृढ बनविणे ही काळाची गरज आहे. ही गरज सर्वार्थाने पूर्ण होण्यासाठी गृहशास्त्र, मानसशास्त्र आणि क्रीडा हे तिन्ही विषय मानवाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे अन् उपयुक्त आहे. म्हणून या विषयाचे महत्त्व जानून घेण्यासाठी आजादी का अमृत महोत्सव'चे औचित्य साधून चिंचोली (लिं.) ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या गृहशास्त्र, मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि अंतर्गत गुणवत्ता कक्ष या विभागाअंतर्गत मानवी विकासात गृहशास्त्र, मानसशास्त्र आणि क्रीडा'चे योगदान या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय बहुविद्याशाखीय आभासी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना माजी शिक्षणाधिकारी डॉ. टी.पी. पाटील म्हणाले की जीवनाचा खरा आनंद घेण्यासाठी काय खावे, कसे खावे, केव्हा खावे, ही शिकवण गृहशास्त्रातून मिळते. तसेच मानसिक आणि शारीरिक स्वास्थ तंदुरुस्त ठेवण्यासाठीचे बळ मानसशास्त्र आणि शारीरिक शिक्षण यांच्या माध्यमातून मिळते. चर्चासत्राच्या बीजभाषक म्हणून उदयपूर (राजस्थान) येथील महाराणा प्रताप कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या डॉ. गायत्री तिवारी उपस्थित होत्या. यावेळी बोलताना डॉ. तिवारी म्हणाल्या की, जीवन हे एक बहुआयामी नाटक असून त्यातील मुख्य भूमिका असणाऱ्या परिवाराला समजून घेण्याची आवश्यकता सामाजिक स्तरावर अत्यंत महत्त्वाची आहे. आयुष्यातील प्रत्येक गोष्ट आपल्या विचारावर अवलंबून असते. म्हणून आपण नेहमी सकारात्मक विचार करुन आपले अनुभव, विचार तसेच व्यवहार यांचा सकारात्मकरित्या समन्वय साधला तर मानवाच्या समस्या सुटतील. पुढे डॉ. तिवारी असेही म्हणाल्या की, समाजात विकृत घटना घडत आहेत हे विचार करण्यापेक्षा त्यामागील कारणे शोधून कौशल्यपूर्ण जीवन जगण्याचा प्रयत्न मानवाने करुन जीवनातील प्रत्येक गोष्टीत सहभाग नोंदवून आपल्या प्रश्नांची उत्तर शोधली पाहिजेत. यावेळी विषयतज्ञ म्हणून नाशिक येथील जी.एम. डी.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुंडलिक



रसाळ यांनी सांगितले की,माणूस भौतिक सुविधांची हाव आणि धाव यांच्या चक्रव्यात अडकल्यामुळे त्याच्या विकासात अनेक अडथळे निर्माण झालेले आहेत. लालसेपोटी व्यक्तीचे स्वतःवर नियंत्रण राहिलेले नाही म्हणून तो या स्पर्धेत स्वतःलाच हरवून बसला आहे. परिणामी देशात सामाजिक विकृतीचे भूकंप निर्माण होऊन परिस्थिती बिघडत असल्याचे आज प्रकर्षाने जाणवते.

चर्चासत्राच्या समारोपात अँथेलेटिक्स असोसिएशन लखनऊ (यू.पी.) विद्यापीठाचे माजी अध्यक्ष डॉ. नीरज जैन यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, विकास ही स्वाभाविक प्रक्रिया असून त्यासाठी सकारात्मक ऊर्जेची आवश्यकता मानवाकडे असावी तसेच संयम आणि त्यागाशिवाय कोणतेच यश प्राप्त होत नसते . म्हणून आपण मानवी संवेदना जपाव्यात आणि आपल्याला हवे असलेले ध्येय प्राप्त करावे . चर्चासत्राच्या अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले यांनी सांगितले की, मानवी जीवनातील सर्व गोष्टीचा सकारात्मकरित्या समन्वय साधून जीवनात सुख-समृद्धी मिळवता येते . प्रास्ताविक गृहशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना बनकर यांनी केले तर सूत्रसंचालन मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. उमाकांत गायकवाड यांनी केले . पाहुण्यांचा परिचय प्रा.रामेश्वर राऊत डॉ.यशवंत गाडे यांनी केला. तर प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी आभार मानले.या चर्चासत्रासाठी देशभरातील विविध 15 राज्यातून 400 अभ्यासक विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवलेला होता. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# मनपा व लॉयन्स क्लबच्या वतीने सांस्कृतिक नृत्यस्पर्धेचे उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** शहर महानगरपालिका, परभणी व लॉयन्स क्लब इंटरनॅशनल नृत्यस्पर्धेचे दि.02/10/2022 रोजी सायंकाळी 7:30 वा. बि.रघुनाथ सभागृह येथे प्रशासक तथा आयुक्त यांच्या हस्ते तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते दिपप्रजोलन करून उद्‌घाटन सोहळा संपन्न. उद्‌घाटन प्रसंगी प्रशासक तथा आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांस्कृतिक कार्यक्रम नृत्यस्पर्धेचे कार्यक्रम परभणी शहर महानगरपालिका, परभणी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त व महात्मा गांधी जयंती यांच्या ओपचारीक साधून मराठ्वाड्यातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

या स्पर्धेमध्ये सर्व कलाकार यांनी भाग घेयून विजय पराजय होत असतो पराजयातून जिद्द ठेऊन पुढील स्पर्धेत भाग गेऊन विजय संपादन करायचा असतो तसेच महानगरपालिकेने गेल्या वर्ष भारामध्ये विविध कार्यक्रम त्यामध्ये त्रिभाषिक कवि संमेलन, नाट्य महोत्सव, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते त्या मध्ये शहरातील जिल्हातील कलावंतानी सहभाग घेतला होता. असे प्रशासक तथा आयुक्त यांनी मनोगत व्यक्त केले.

बक्षीस समारंभ रात्री 10:30 वा. प्रथम रोहन वाघमारे 5000 रु.वसमत, व्दितीय शेख शाकेर 3000 रु.नांदेड, उत्तेजनार्थ महेंद्र दांडगे परभणी, शेख कबीर हिंगोली, अजय टोपे जिंतूर, सर्वांना बक्षीस लॉयन्स क्लबचे अध्यक्ष सुनील मुथा, झोन मॅनेजर प्रदीप गोलोच्छा, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव यांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळा संपन्न कार्यक्रमाचे संचलन राहुल वावळे यांनी केले.

परभणी शहर महानगरपालिका, परभणी व लॉयन्स क्लब इंटरनॅशनल राज्यस्तरीय दि.१७ सप्टेंबर २०२२ मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त परभणी शहर महानगरपालिका, परभणी व लॉयन्स क्लब इंटरनॅशनल राज्यस्तरीय नृत्यस्पर्धा कार्यक्रम दि.02/10/2022 रोजी सायंकाळी 7:30 वा. बि.रघुनाथ सभागृह येथे उद्‌घाटन सोहळा संपन्न. उदघाटन प्रसंगी लॉयन्स क्लब चे अध्यक्ष सुनील मुथा, झोन मॅनेजर प्रदीप गोलोच्छा, झेड मुथा, निरज पारिख, तुषार मराठे, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, शेख बशीर सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन सोहळा संपन्न. व्यसपीठावरील सर्व मान्यवरांचा सत्कार अजिज खुरेशी असेफ सर यांनी सत्कार केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, भांडारपाल रामेश्वर कुलकरणी, केशव पैके लॉयन्स क्लब यांच्या वतीने अजीज खुरेशी, आसेफ सर यांनी परिश्रम घेतले.

# नगरमधील रुग्णालयाची ब्रिटनमध्ये 'वर्ल्ड बुक ऑफ रेकार्ड्स'मध्ये नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** कोविड काळात उत्कृष्ट वैद्यकीय सेवा दिल्याबद्दल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डतर्फे नगरमधील साईदीप हॉस्पिटलचे डॉ. दीपक यांचा लंडनमध्ये ब्रिटिश पार्लियामेंटमध्ये प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यानिमित्त साईदीप हॉस्पिटल आणि हेल्थ केअर ट्रस्ट यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. दीपक पुढे म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण पूर्ण करुन नगरमध्ये आल्यानंतर मला माझे स्वतःचे हॉस्पिटल ज्यामध्ये सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देता येतील असे नेहमी वाटत होते. ते एक स्वप्न मी पहिले आणि ते साकार करण्यासाठी जिद्द उराशी बाळगून मी सतत वैद्यकीय क्षेत्रात नाविन्यपूर्ण सुविधा, ज्यामुळे अचूक निदान करता येऊ शकते आणि रुग्णास योग्य ते उपचार उपलब्ध करता येऊ शकतात हे ध्येय ठेवले. प्रचंड मेहनतीने दीपक हॉस्पिटल सुरु केले. पण, मन मान्य करत नव्हते. दीपक हॉस्पिटलमध्ये जागा कमी पडू लागली मग माझे मित्र सहकारी संचालक यांच्याकडे साईदीप बाबत विषय मांडला. ज्यामध्ये आम्ही सर्व ३० वर्षांपेक्षा जास्त प्रॅक्टिस करणारे डॉक्टर्स आणि आमची डॉक्टर्स मुले सर्वजण एकाच छताखाली वैद्यकीय सेवा देऊ शकतील, म्हणून १३ मजली इमारतीमध्ये साईदीपची निर्मिती करु. अखेर १३ मजले असलेली परिपूर्ण हॉस्पिटल निर्माण करता आले आणि गेली ३ वर्षापेक्षा जास्त काळ हे हॉस्पिटल लोकांच्या ह्दयात बसले असून सर्व तपासण्या, योग्य उपचार आणि समाधानी रुग्ण आणखीन काय पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालरोग तज्ञ डॉ. अनिलकुमार कुऱ्हाडे यांनी केले. जेष्ठ संचालक डॉ. आर.आर. धूत, डॉ. रविन्द्र सोमाणी, डॉ. कैलाश झालानी, डॉ. विकास लबडे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. साईदीप हॉस्पिटलतर्फे जेष्ठ संचालक डॉ. श्यामसुंदर केकडे व विलास काळभोर यांनी डॉ. दीपक यांचा व डॉ. सीमा शेख यानी सौ. ज्योति दीपक यांचा सत्कार केला. सूत्रसंचालन ड़ॉ.पायल धूत यानी केले व आभार डॉ. व्ही. एन. देशपांडे यांनी मानले. यावेळी डॉ. इक्बाल शेख, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. रोहित धूत, डॉ. साहिल शेख, डॉ. साहिल कुलकर्णी, डॉ. भूषण खर्चे, डॉ . गणेश सारडा, डॉ. मेहवाश साहिल शेख, साईदीप हेल्थ केयर ट्रस्टच्या अध्यक्षा नंदा सोमाणी, रोहिणी कुर्हाडे, शोभा धूत, अनिता झालानी, सुनीता देशपांडे,इशिता झालानी, साईदीप हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर्स, प्रशासन विभागातील सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेपत्ता मुलीचा चोवीस तासांत शोध; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिकरोड :** फूस लावून पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीला संशयितासह ताब्यात घेण्याची कामगिरी नाशिकरोड पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्याच्या चोवीस तासांत पार पाडली आहे. गोरेवाडीतील शास्त्रीनगर येथून या घटनेतील पीडित चौदावर्षीय मुलीस ३० सप्टेंबर रोजी संशयित सत्येंद्र ऊर्फ बिट्टू रामपाल मेहेरोलिया याने फूस लावून पळवून नेल्याचे उघडकीस आले. पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता. पोलिस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकरोड पोलिसांकडून बेपत्ता मुलीचा तपास सुरू केला असता या अल्पवयीन मुलीला संशयिताने हॉटेलमालक ॲलेस राजाप्पा वर्गीस याच्या हॉटेल सचिन रिजन्सीमधील एका खोलीत ठेवले असल्याचे निष्पन्न झाले. हॉटेलमधील रूम देताना अल्पवयीन मुलीसह संशयिताच्या ओळखपत्राची पडताळणी न केल्याची बाबही उघड झाल्याने पोलिसांनी हॉटेलमालक ॲलेस यालादेखील अटक केली.




**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार अंतर्गत असलेल्या कांदा मार्केट मध्ये विजय दशमी निम्मित भुईकाट्याचे प्रशासक किरण चौधरी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले यावेळी बाजार समितीच्या प्रशासक म्हणून किरण चौधरी यांची निवड झाल्या बद्दल सर्व कांदा व्यापार्याच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी सचिव के. आर. रणयेवले, गंगाधर निमसे, आर. आर. तांबे, रामदास तायडे, संतोष पवार, देवीदास चव्हाण, गणेश देवकर, फकिरचंद पवार, महेंद्र वंजारे, संतोष पठारे, कल्याण वंजारे, गणेश ताटु आदी शेतकरी उपस्थितीत होते. यावेळी सर्व बाजार समितीचे अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, हमाल, मापाडी यांच्यावतीने नवनियुक्त प्रशासक किरण चौधरी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.



# गंगापूर गटशिक्षण विभाग अधिकाऱ्यांना मुख्यालयात राहण्याचे वावडे

आधुनिक केसरी न्यूज




**गंगापूर :** शहरातील गटशिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी वेळेवर हजर राहत नाही तसेच गंगापूर तालुक्यातील सर्व प्रशासकीय कर्मचारी व अधिकारी मुख्यालयात वेळेवर हजर राहत नाही, तर काही ठिकाणी अधिकारी मुख्यालयात येतच नाही अशी परिस्थिती काही ठिकाणी दिसून येत आहे.
अशी माहिती विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष वाल्मीक शिरसाठ यांनी दैनिक महाराष्ट्र प्रतिनिधी यांना दिली तसेच गंगापूर गट शिक्षण विभागात दि.३/१०/२०२२ रोजी पाहुणे अकरा वाजले तरीसुद्धा गटशिक्षणाधिकारी व कर्मचारी कार्यालयात हजर नाही अशी परिशिष्टे गंगापूर शहराची झालेली आहे. खालच्या पातळीपासून तर वरच्या पातळीपर्यंत अधिकारी गैरहजर राहतात यांच्यावर वरिष्ठ अधिकारी कडक कारवाई करत नाही. यामुळे अधिकाऱ्यांचे मनमानी कारभार गंगापूर तालुक्यात चालत आहे. तसेच काही अनुदानित शाळांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांकडून परीक्षा फि तीनशे रुपये वसूल केली जात आहे.
शासनाने अनुदानित शाळांना व संस्थांना विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी आकारण्याचे अधिकार नाही, असे शासन निर्णय असून सुद्धा शाळांना व संस्थांना विद्यार्थ्यांकडून तिनशे रुपये फी वसूल करून विद्यार्थ्यांची व पालकांची लूट देखील या ठिकाणी केली जात आहे, असे शिक्षकांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पालकांमधून करण्यात येत आहे. तसेच गंगापूर शहरामध्ये ज्ञान प्रभोदीनी पब्लिक स्कूल शाळांमध्ये पहिली ते दुसरीचे विद्यार्थ्यांना अर्धवट पुस्तके वाटप करण्यात आलेले आहे. काही विद्यार्थी आजपर्यंत पुस्तक मिळाले नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान होत आहे याकडे लक्ष करणार कोण असा प्रश्न पालकांमधून उपस्थित केले जात आहे.



# अक्रम बेग यांची लासूर स्टेशन युवा शहराध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन शहराच्या एम आय एम पक्षाच्या युवा अध्यक्षपदी निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले. एमआयएमचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खा.इम्तियाज जलील यांनी एम आय एम पक्षाच्या लासूर स्टेशन यूवा शहर अध्यक्ष पदी अकरम बेग यांची निवड केली व पुढील वाटचालीस शूभच्छा दिले. या वेळी जिल्हा अध्यक्ष समिर साजिद बिल्डर व गंगापूर ता. अध्यक्ष राहुल वानखेडे, तालुका ऊपअध्यक्ष अजित जाधव. शहर अध्यक्ष योगेश साळवे. राजेक सय्यद जूनेद शेख शाहरूख शाह यांची प्रमुख उपस्थितीत होती.

# दांडिया कार्यक्रमातील वादामुळे नाशकात तरुणाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** टाकळीकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या शिवाजीनगर भागात आयोजित दांडिया कार्यक्रमातील वादामुळे एका तरुणाची हत्या करण्यात आली. नाशकात मंगळवारी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास ही गंभीर घटना घडली. दांडिया खेळताना लागलेल्या धक्क्याचा वाद कार्यक्रम संपल्यावर उकरुन काढण्यात आला. त्यावेळी बबलू उर्फ कमल लोट याच्या पोटात धारदार चाकू खूपसण्यात आला. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु असताना बुधवारी पहाटे त्याचा मृत्यू झाला. उपनगर पोलिसांनी या प्रकरणी चौघांना ताब्यात घेतले असून, तीन अल्पवयीन मुलांचा त्यामध्ये सहभाग आहे. शहरात नवरात्रोत्सवात आयोजित दांडिया कार्यक्रमात सशस्त्र तरुणांनी गोंधळ घातल्याचा प्रकार अंबडमध्ये घडला. तर, जेलरोड भागात एका अल्पवयीन मुलीवरही हल्ला करण्यात आला होता. रविवारी घडलेल्या या घटनांमुळे दांडिया कार्यक्रमांवर तणाव असतानाच मंगळवारी मध्यरात्री तरुणाला किरकोळ कारणातून भोसकण्यात आले. बबलू लोट आणि त्याचा मित्र अनिकेत शिंदे (रा. शिवाजीनगर) हे दांडिया खेळण्यासाठ गेले. तिथे अनिकेतला एका अल्पवयीन मुलाचा धक्का लागला. त्यामुळे त्यांच्यात वाद झाले.
दांडिया संपल्यावर सर्वजण घराकडे जात असताना बबलूने मित्राला धक्का का दिला, यावरुन अल्पवयीन मुलांशी वाद घातला. या वादाचे हाणामारीत रूपांतर झाले. धक्का लागलेल्या मुलाचे इतर साथीदार तिथे आले. त्यापैकी एकाने बबलूच्या पोटात चाकू खुपसला. मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरु झाल्याने संशयित अल्पवयीन मुलांनी पळ काढला. त्वरित इतरांनी बबलूला खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, बुधवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास बबलूचा मृत्यू झाला. मित्र अनिकेतच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी हत्येचा गुन्हा संशयितांविरुद्ध दाखल केला आहे.

# अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचा शिवसेनेला पाठिंबा

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार रमेश लटके यांच्या यांच्या आकस्मित निधनामुळे अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक लागलेली आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्ष आपला आपला उमेदवार देणार नसून महाविकास आघाडी म्हणून शिवसेनेच्या उमेदवाराला पाठिंबा देणार आहे अशी घोषणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. या संदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर जातीयवादी धर्मांत भारतीय जनता पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी महाराष्ट्र विकास आघाडी स्थापन झाली होती राज्यात अडीच वर्षे या महाविकास आघाडीचे सरकार होतं या सरकारने शेतकरी कर्जमाफी सारखे अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. कोरोनासारख्या महाभयंकर संकटकाळात देशात सर्वोत्तम काम केले. पण सत्तापिपासू भारतीय जनता पक्षाने ईडी सीबीआय या केंद्रीय संस्थाचा दुरुपयोग करून शिवसेनेच्या आमदारांना फोडून महाविकास आघाडी सरकार पाडले. महाविकास आघाडी फोडण्याचे प्रयत्न भाजपने केले ते यशस्वी झाले नाहीत म्हणून त्यांनी शिवसेना पक्ष फोडला. भारतीय जनता पक्षाविरोधातील या लढाईत महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस पक्ष शिवसेनेसोबत खंबीरपणे उभा आहे त्यामुळे अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेस पक्ष आपला उमेदवार देणार नसून शिवसेना पक्ष जो उमेदवार देईल त्याला निवडून आणण्यासाठी काँग्रेस पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते पूर्ण ताकदीने काम करतील असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# अंधानेर उपकेंद्र येथे गरोदर मातांचे डोहाळजेवण

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील दिनांक ५ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेर येथील अंधानेर उपकेंद्र येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित या मोहीम अंतर्गत गरोदर मातांचे डोहाळजेवण करण्यात आले. यावेळी महिलांची आरोग्य तपासणी रक्तातील शुगर, एच बी, बीपी, वजन, उंची इ. तपासणी करण्यात आली. गरजेप्रमाणे औषधांचे वाटप करण्यात आले. तसेच गर्भवती माता यांना नाष्टा व अल्पप्रोहार देण्यात आला. व यावेळी गर्भवती महिलांचा चागला प्रतिसाद मिळाला, गरोदर माता ४५ स्तनदामाता २५ व १८ वर्षावरील ११७, ३० ते ६० वयोगटातील ३९ लाभार्थी होते. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एस.के.मुळे, ग्रामविकास अधिकारी एम.डब्ल्यु. पगारे ,वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.ए. लोखंडे,समुदाय आरोग्य अधिकारी पी.जी.राहणे औषध निर्माण अधिकारी एस.आर.माळशिखरे , लेखापाल ए.बी.शेट्टी, आरोग्य सहाय्यक बी.एस.पवार,एल. सी.चव्हाण, आरोग्य सहाय्यीका के.बी.कुंडले,आरोग्य सेवक बी.एन.डोळस,पी.के.नावरकर,डी. के.राठोड ,आरोग्य सेविका एस. के.मुरुग ,एस.एन.साकळे , बीसीएम स्वप्नाली वैष्णव गट प्रवर्तक व्ही.जी.राजपूत , वाहन चालक यतिराज पैठणपगारे व सर्व आशा स्वयंम सेविका आदी उपस्थित होते.

# एसटी बसेसची संख्या घटल्याने प्रवाशांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज



**नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यातून शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यासाठी १२० बसेस बुक करण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील एसटी बसच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. एसटी बसच्या फेऱ्या रद्द झाल्याचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसत असल्याचं चित्र दिसून येत आहे. नंदुरबार बस आगारातून सुटणाऱ्या अनेक बस फेऱ्या रद्द झाल्याने प्रवाशांना ऐन सणासुदीच्या दिवशी बसची वाट पाहत तात्काळत बसावे लागत आहे. तर दुसरीकडे खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांकडून अचानक भाडेवाढ करण्यात आल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काल नंदुरबार येथून मुंबईकडे दसरा मेळाव्यासाठी जवळ पास सात हजार शिंदे गटातील कार्यकर्ते रवाना झाले आहेत. मुंबई येथील बिकेसी मैदानावर शिंदे गटाच्या दसऱ्या मेळाव्यासाठी काल सायंकाळी नंदुरबार येथून १२० बसेस मुंबई कडे रवाना झाल्या. मात्र, जिल्ह्यातील बस स्थानकांवर प्रवाशांना बसेसची गैरसोय होतांनाचे चित्र पाहावयास मिळत आहे. शिवसेना शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यासाठी राज्यभरातून खासगी ३ हजार बसेस बुक करण्यात आलेल्या आहेत. शिंदे गटाने आतापर्यंत १८०० एसटी बस बुक केल्या असल्याची नोंद आहे. यासाठी तब्बल १० कोटी रुपये रोख भरले असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाने सोमवारी सायंकाळी ५ पर्यंत १८०० एसटी गाड्यांचे आरक्षण केले होते. तीन हजार खासगी गाड्यांचे यापूर्वीच आरक्षण पूर्ण झाले आहे. बांद्रा कुर्ला संकुलात सभा होत असल्याने लाख-दीड लाख लोकांची गर्दी अपेक्षित आहे.

# जागतिक फार्मसी दिवस उत्साहात साजरा

## कुंजखेडा येथील डी व बी फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी काढली रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** तालुक्यातील कुंजखेडा येथील वस्तानवी डी व बी फार्मसीतील विद्यार्थ्यांकडून जागतिक फार्मसी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व प्रथम कुंजखेडा गावातून भव्य अशी औषध जनजागृती रॅली काढण्यात आली. फार्मसी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी डेंग्यू आणि लम्पि या आजार बाबत नागरिकांनी व पशुपालन शेतकरी बांधवांनी घ्यावयाची खबरदारी म्हणून चिखलठाण पंचक्रोशीतील हिवरखेडा.ना, वडाळी, चिखलठाण व दाभाडी या गावात जाऊन जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीच्या माध्यमातून गावातील नागरिकांशी हितगुज साधून या आजाराविषयी माहिती देऊन कन्नड येथे सिद्दीकी चौक, नगरपरिषद कन्नड, येथे रॅलीतून लोकांमध्ये जनजागृतीसाठी चौका-चौकांत औषधांचे दुष्परिणाम, औषधांचे डोस, पेशंट काउन्सिलींग या विषयांवर पथनाट्ये सादर करण्यात आली. तहसील कार्यालय कन्नड या ठिकाणी रॅलीची सांगता करण्यात आली.
उमर बिन खत्ताब संस्थेचे समन्वयक शरीफ बेग त्यांनी विद्यार्थ्यांना फॉर्मसिस्टचे समाजातील कार्य, महत्त्व, औषधी व्यापाराविषयी संकल्पना, इथिकली व्यवसाय कसा करावा या संदर्भात मार्गदर्शन केले. बी. फार्मसीचे प्राचार्य काजी इमादुद्दीन यांनीही मार्गदर्शन केले. डी फार्मसीचे प्राचार्य शेख मुज़म्मिल यांनी जागतिक फॉर्मसी दिवस का साजरा करण्यात येतो व फॉर्मसिस्टचे समाजातील योगदान काय आहे याची माहिती दिली. यावेळी या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मौलाना फारूक वस्तानवी हे होते. फारूक सर,अझहर सर,रेहान सर,राशीद सर, रफिक सर,अल्ताफ सर, खलील सर,पत्रकार सय्यद आरेफ़ व इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# तुळजापूर मंदिरात सीमोल्लंघनाचा सोहळा जल्लोषात

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** श्री तुजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात तुळजापूर येथे आज पहाटे 6 च्या सुमारास तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघनाचा सोहळा पार पडला. श्री तुळजाभवानी मंदिरात पहाटे विधीवत पूजा व आरती करुन देवीचे माहेर असणाऱ्या नगरहून आलेल्या मानाच्या पालखीत देवीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. पिंपळाच्या पारावर देवीची पालखी टेकवून पुन्हा आरती करण्यात आली. मिरवणुकीनंतर प्रथेप्रमाणे पारंपारिक पध्दतीने मंत्रोच्चार, आई राजा उदो उदोचा जयघोष आणि संबळाच्या साथीने सर्व विधी करण्यात आले. तुळजाभवानी देवीची मूर्ती ही चल मूर्ती असल्याने ती आपलं सिंहासन सोडून सीमोल्लंघन करण्यासाठी भाविकांच्या बरोबर मंदिराच्या बाहेर येते. सीमोल्लंघना नंतर देवी पुन्हा पौर्णिमेपर्यंत निद्रा अवस्थेत जाते. यावेळी देवीच्या मुर्तीला इजा होऊ नये म्हणून 108 साडया परिधान करण्यात येतात. शेवटी प्रथेनुसार नगरच्या भक्तांनी श्रीदेवीजींची पालखी तोडून पालखीचे होमात विसर्जन केले यावेळी सर्व भाविकांनी कूंकू व फुलांची उधळण करत आई राजा उदो-उदोचा जल्लोष केल्याने मंदिर परिसर दुमदुमून गेला. यावेळी मंदिरातील धार्मिक कार्यक्रमास श्री तुळजाभवानी मंदिरात जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ.सचिन ओंबासे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ.योगेश खरमाटे, तहसीलदार तथा व्यवस्थापकयोगिता कोल्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, मंदिर संस्थानचे सहायक व्यवस्थापक विश्वास कदम, सहायक जनसंपर्क अधिकारी नागेश शितोळे यांच्यासह पाळीकर पुजारी मंडळ, उपाध्ये मंडळ, भोपे, पुजारी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विठ्ठलनगर, रामनगर प्रकाशनगर,संघर्ष नगर या सर्वाच्या वतीने विठ्ठलनगर चौक येथील ज्ञानसागर वाचन ला येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संदिपान बापू काळे हे होते. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून शिक्षक विनायक रावजी पवार हे होते.

यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्याप्रसंगी प्रमुख वक्ते विनायक पवार यांनी सत्य अहिंसा व मानवता हे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची विचार समाजातील जात धर्म पंथ पक्ष असा विचार न करता आपण सर्व एक आहोत ही भावना रुजवली वअहिंसेचा माध्यमातून या जुलमी ब्रिटिश राजवटीच्या लोकांना या देशातून हाकलून लावले कोणतेही व्यक्ती मानव म्हणून जन्माला आलेली असते जन्माला येताना त्याला फक्त मानव एकच उपमा असते नंतर मात्र त्याला जाती धर्माचे पंथाचे विविध राज्य राजकीय पक्षाचे मुखवटे येत असतात जय जवान जय किसान हा नारा लालबहादूर शास्त्री यांनी पाकिस्तानच्या 1965 मधील झालेल्या युद्धाच्या अनुषंगाने जवानांना जवानांना प्रोत्साहन देण्याकरिता अमोल मंत्र दिला तसेच आपल्या देशाचा पाठीचा कणा म्हणून शेतकऱ्यांनाही जय किसान असं नारा दिला असे थोर महापुरुष फार क्वचितच जन्माला येतात. यांचा आपण आदर्श घेतला पाहिजे जातिपातीला तीलांजली देऊन आपण समाजासाठी संकटाच्या काळात सतत झगडत राहिलं पाहिजे त्यांच्यासाठी धावून गेलं पाहिजे हीच या जयंतीच्या निमित्ताने खरी आदरांजली होईल याप्रसंगी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष गंगाराम जी कापसे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अंकुश राजे चौधरी कॉम्रेड पक्षाचे भास्कर जी लहाने शिवसेना व्यापारी व्यापारी शहरा गाडीचे शहराध्यक्ष श्री वल्लभ शेठ भंडारी काँग्रेस पक्षाचे सुभाष पाटील पांडभरे लक्ष्मण मुळे ज्ञानेश्वर जाधव ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे शरद बोरकर नारायण नामे गोपीनाथ मगरे सुभाषराव भालेराव चंदू भाऊ काळे तुकाराम साबळे रामेश्वर शिंदे हेमंत नरवडे पाटील, सतीश इंगळे, संतोष बागुल आतिश गवळे, कारभारी वाहुळ, सुभाष शुक्ला, अशोक कुबडे, पांडुरंग सोनटक्के, सतीश पवार संतोष वाघमारे कासलीवाल, कोल्हे मामा, काळे मामा, दीपकीमस्के दसरत मानवतकर, खपले आप्पा, सूर्यकांत कासनाळे इत्यादी नागरिक उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉम्रेड भास्कर लहाने यांनी केले. प्रस्ताविक सुभाष पाटील पांडभरे यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दशरथ मानवतकर यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शामराव शिंदे, चंदूभाऊ काळे, आतिश गवळे, सुभाष शुक्ला, तुकाराम साबळे, सतीश पवार, दिलीप पवार, दीपक मस्के साहेब हेमंत रोडे पाटील यांनी परिश्रम घेतले.

# नगरसेवक हिरामण गवळी यांना धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून हद्दपार करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक हिरामण गवळी यांच्यावर दंगलीचे खंडणीचे विविध स्वरूपाचे तीनपेक्षा अधिक गंभीरपणे गुन्हे असल्याने त्यांना धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून हद्दपार करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन भीमशक्ती संघटनेचे धुळे जिल्हाध्यक्ष कपिल दामोदर यांनी जिल्हा पोलीस प्रशासनाला दिले आहे. कपिल दामोदर यांनी मोजके काही व्यापाऱ्यांच्या विरोधात तक्रारी केल्या असल्याने त्यांच्यावर कारवाई करावी या आरोपाचे मनपा आयुक्त यांना भारतीय जनता पक्षाच्या लेटरपॅडवर हिरामण गवळी यांनी निवेदन दिले होते.

परंतु धुळे शहराचे भारतीय जनता पक्षाचे स्विकृत नगरसेवक हिरामण गवळी हे बेकायदेशीरपणे बांधकाम करणारे शासकीय महसुल बुडविणारे काही मोजके व्यापाऱ्यांना पदाचा दुरुपयोग करून पाठीशी घालत असून त्यांनी आमच्या विरोधात कुठल्याही प्रकारचे पुरावे नसतांना खोटेनाटे बिनबुडाचे आरोप करुन आमची बदनामी केली असल्याने त्यांच्यावर अब्रुनुकसानी, मानहानी दावा दाखल करण्यात यावा. तसेच हिरामण गवळी यांच्यावर दंगलीचे, खंडणीचे विविध स्वरुपाचे ३ पेक्षा अधिक गंभीर गुन्हे असल्याने त्यांना धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून हद्दपार करण्यात यावे अशी मागणी जिल्हा पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनातून भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष कपिल दामोदर यांनी केली आहे.

# वन्यजीव सप्ताह निमित्ताने जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** घाणेगाव तांडा येथे दि.३/१०/२२ सोमवार रोजी अजिंठा येथील वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वन्यजीव सप्ताह निमित्ताने जनजागृती कार्यक्रम संपन्न वनपरिमंडळ अंतर्गत सावळदबारा वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे घाणेगाव येथे प्राथमिक व उच्च प्राथमिक आश्रम शाळा येथे वन्यजीव सप्ताह 2022 निमित्ताने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सरपंच रत्नाताई सुरेश चव्हाण, उपसरपंच हिरा जाधव, गोविंद महाराज, सुरेश चव्हाण, लक्ष्मण पवार, ग्रामसेवक एस.ए. रणजिते, वन परिमंडळ अधिकारी अविनाश राठोड, वनरक्षक एस बी खर्डे, वनरक्षक एस.डी. चाथे, वनरक्षक जि. पी. नन्नावरे, वनरक्षक बी. आर. राठोड, वनरक्षक डी. ए. वाघ वनमजूर के डी महाकाळ गावातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरी, मुख्याध्यापक, तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी मानव वन्यजीव संघर्ष, आझादी का अमृत महोत्सव, झाडे लावा झाडे जगवा, वन्यप्राणी संरक्षण व संवर्धन, जंगल संरक्षण व संवर्धन याबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले.



# नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करा

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** मौ. गोगलगाव, सावंगी मगर, मंगरूळ, करंजी, नरळद आदी ठिकाणी ०१ ऑक्टोबर रोजी झालेल्या वादळी वाऱ्या मुळे व पावसा मुळे शेती पिकांचे नुकसान झाले आहे नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने दिनांक ०३ ऑक्टोबर रोजी मानवत तहसीलदार सारंग चव्हाण यांच्याकडे एका निवेद नाद्वारे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मानवत तालुक्यातील मौ. गोगलगाव, सावंगी मगर, मंगरूळ, करंजी, नरळद आदी ठिकाणी ०१ ऑक्टोबर रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे व पावसामुळे कापूस, सोयाबीन, तूर, या शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून या बाबत सबंधित तलाठी यांना नुकसानीची माहिती देण्यात आली आहे. परंतु अद्याप कुठली ही कार्यवा ही झाली नसल्याने या बाबत योग्य ती दखल घेऊन त्वरित संबंधित अधिकारी यांना पंचनामा करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली असून निवेदनावर अक्रूर मगर, मुकुंद मगर, कल्याण देशमुख, गोपाळ जाधव, विठ्ठल जाधव, गोविंद मगर, रामेश्वर मगर, राधाकिसन सोनार, माऊली पितळे, अमोल ढगे, विलास ढगे, ज्ञानेश्वर फ़ंड, गोविंद चोरमले, सुरेश मगर, कुंडलिक निलवर्ण, रितेश निलवर्ण, किरण मगर, भारत मगर, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# माता सुरक्षित तर सुरक्षित महिलांसाठी अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जयकालिंका देवी शिक्षण संस्था सावळदबारा संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा प्राचार्य नारायण कोलते(पाटील) व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही.पी.राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यालयात "माता सुरक्षित तर घर सुरक्षित"अभियान दि.३/१०/२२ सोमवार रोजी राबविण्यात आले. नवरात्रोत्सवानिमित्त आरोग्य विभागामार्फत 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित हे अभियान राबविले जात असून, प्राथमिक रुग्णालय सावळदबारा यांच्या वतीने अभियान सुरु करण्यात आले असून या अंतर्गत गरोदर माता व १८ वर्षावरील महिलांची मोफत तपासणी व उपचार करण्यात येणार असून, जास्ती जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही.पी.राजपूत यांनी शिवाजी विद्यालयात अभियानात सांगितले.वैद्यकीय अधिकारी डॉ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. हे अभियान ५ ऑक्टोबर २०२२ या नवरात्रोत्सव कालावधीत विविध उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.अशी माहिती प्रा.जीवन कोलते यांनी उपसंपादक गोकुळसिंग राजपूत याच्याशी बोलताना सांगितले. याप्रसंगी रत्नाताई पंजाबराव कोलते सचिव, प्रा.मदनभाऊ डोखळे, प्रा.गजानन चव्हाण, निता हिरास, सरपंच स्वातीताई कोलते,उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, रामचंद्र चिमणकर,दिपक मानकर, राजू तडवी, ईसा तडवी, मयूर महाजन, योगेश टिकारे, संजय राजपूत, संदीप सुर्यवंशी,भास्कर खंबाट,अमोल गवई,अजाबराव राजपूत,शाम जाधव,शिक्षकवृंद, विद्यार्थी,महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सत्तार यांच्या नेतृत्वाखाली दसरा मेळावासाठी 500 बसेस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सोयगाव, फर्दापूर-सावळदबारा मतदारसंघातून जवळपास 500 बसेस व इतर लहान मोठी वाहने मुंबई येथील बिकेसी मैदानावर होणाऱ्या दसरा मेळावासाठी रवाना झाल्या आहेत. कृषीमंत्री अब्दुल सत्तार सोयगाव मित्र मंडळाचे सुरेख पद्धतीने नियोजन यावेळी दिसून आले. आज सकाळ पासूनच शिवसैनिकांनी सोयगाव येथील मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कार्यालय येथे गर्दी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी व त्यांना समर्थन देण्यासाठी प्रचंड संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी मतदारसंघात बैठका घेवून शिवसैनिकांना अवाहन केले होते. या आवाहनाला साद देत ग्रामीण भागातील सावळदबारा, देव्हारी, टिटवी, पिंपळवाडी, महाल्बदा, चारुतांडा, नादातांडा नादागांव,मोलखेडा, हिवरी, चारुतांडा,घाणेगांव तांडासह प्रचंड संख्येने शिवसैनिक मुंबईकडे रवाना झाले आहेत. यावेळी नादातांडा येथे शुद्धा सोयगाव पंचायत समितीचे मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांच्या कार्यालयावर शिवसैनिकांनी मुंबईला जाण्यासाठी मोठी गर्दी केली होती. दारासिंग चव्हाण, मा. शिवाआप्पा चोपडे, धरमसिंग चव्हाण, देवीदास चव्हाण, सरपंचपती सुरेश चव्हाण, पत्रकार गणेश खैरे, सरपंच ज्ञानेश्वर वारांगणे, अमोल शेळके, आतुल इंगळे, ग्रा.सदस्य मोहन सुरडकर, दिपक गावडे, अरुण नप्ते, लखन चव्हाण, सरपंच भागवत जाधव, संदीप जाधव,सरपंच राहुल हेलोडे, मा.सरपंच किसन सुर्यवंशी अशे मोठ्या संख्येने शिवसैनिक दसरा मेळावासाठी मुंबईकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले.



# सारथीने २०१९ च्या संशोधकांना छात्रवृत्ती द्यावी

## ज्येष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची प्रशासनाकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सारथी संशोधन आधि छात्रवृत्ती २०१९-२०२० च्या संशोधक विद्यार्थी वर्गाला देऊन महिलांना खास बाब म्हणून संशोधना कार्यासाठी वयोमर्यादेची काही एक अट ठेऊ नये, अशी महत्वपूर्ण मागणी जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी सारथीचे कार्यकारी संचालक अशोक काकडे व प्रशासना कडे केली आहे.

या निवेदनात त्यांनी नमुद केले की, मराठा, कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी या लक्षित गटातील समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासा करिता दिनांक २५ जून २०१८ रोजी सारथीकडून विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले गेले आहेत. सन २०१९ साली आधीछात्रवतीची सुरुवात केली गेली. त्यासाठी साधारणतः पाचशे मुला मुलींसाठी या आधि छात्रवृत्तीचा फायदा घेता यावा असे होते परंतु पहिल्या जाहीरातीतील जागेच्या संख्येनुसार विद्यार्थी न मिळाल्याने सप्टेंबर २०१९ मध्ये दुसरी जाहीरात काढून उर्वरित विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी सारथी संस्थेने साजेसे प्रयत्न केले.



परंतु सप्टेंबर २०१९ मध्ये जाहीरात काढून देखील कोरोना महामारीमुळे तब्बल २२ महिने मुलाखत व डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन होत राहीले.

सर्व कालखंडात सप्टेंबर २०१९ (२०२०) चे विद्यार्थी अधिछात्र वृत्तीपासून वंचित राहिले त्यामुळे २०१९ ची उर्वरित (२०२०) विद्यार्थ्यांना जून२०१९ च्या जाहिरातीनुसार विद्यार्थ्यांना ज्या सोयीसुविधा पुरवल्या, त्या २०१९ उर्वरित (२०२० जाहीरातीतील विद्यार्थ्यांना देखील फायदा व्हावा तेव्हा कुठेतरी आर्थिक व सामाजिक उन्नती झाली असे म्हणता येईल असे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. पुढे ते म्हणतात की, वास्तविक पाहता २०२० च्या विद्यार्थ्यांची संख्या ही अत्यल्प म्हणजे २०४ एवढीच असुन सद्यस्थिती पाहता ती संख्या १६० ते १७० चा दरम्यान आहे. (काही संशोधकांनी तर सारथी फिलोशीप सोडून दिली आहे) अशी वेळ अन्य विद्यार्थ्यांवर येऊ नये म्हणुन गरीब होतकरू, शेतकरी, शेतमजूर, कामगार, ऊसतोड, कामगारांच्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही बाब म्हत्वाची ठरणार आहे. जून २०१९ ची पहिल्या जाहिराती नुसार उर्वरित सप्टेंबर २०१९(२०२०)च्या विद्यार्थ्यांना आधिछात्रवृत्ती, एचआरए कॉन्टिजन्सी अदा करण्यात यावी किंवा आर्थीक नुकसान होऊ नये म्हणुन एखादा मध्यम मार्ग काढावा जो की विद्यार्थी हिताचा असेल. २०१९ ची उर्वरित जाहीरातीतील (२०२०) विद्यार्थ्यांना फॉर्म भरता वेळी सूचना न देता फॉर्म भरून घेऊन त्यांना कोरोनाच्या काळाचे नुकसान सहन करावे लागत आहे.

म्हणून सप्टेंबर २०१९ च्या(२०२०) विद्यार्थ्यांच्या बाबतीत सुसुत्रता व पारदर्शकता आणून सर्व विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा सप्टेंबर २०१९ (जाहीरात) च्या विद्यार्थ्यांना (२०२०) सबमिशन कधीपर्यंत केले पाहिजे? पीएचडीला कंटिन्यू कधी (कोणत्या दिनांक पर्यंत) केले पाहीजे? याची स्पष्टता होऊन राज्यातील उपरोक्त सर्वच विद्यार्थ्यांना सदरचा फायदा मिळवून द्यावाअशी मागणी जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी सारथी प्रशासनाकडे केली आहे.

# 'लोकस्वराज्य आंदोलन'ची उमरी येथे महत्त्वाची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** येथे दिनांक 14 ऑक्टोबर रोजी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर यांच्या आदेशाने लोकस्वराज्य आंदोलन संघटनेची महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केलेले आहे तरी उमरी तालुक्यातील सर्व समाज बांधवांना सुचित करण्यात येत आहे की लोकस्वराज्य आंदोलन संघटनेच्या वतीने मार्केट कमिटी उमरी येथे दिनांक १४/१०/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेले आहे. तरी या बैठकीला लोकस्वराज्य आंदोलन संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, मा. व्हि.जी. डोईवाड सर व लोकस्वराज आंदोलन महाराष्ट्र कामगार आघाडी अध्यक्ष रावसाहेब दादा पवार, लोकस्वराज आंदोलन नांदेड जिल्हा अध्यक्ष पंडितरावजी वाघमारे व तालुकाध्यक्ष साहेबराव गव्हाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी उमरी तालुक्यातील सर्व लोक स्वराज्य आंदोलन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मार्केट कमिटी येते दुपारी दोन वाजता हजर राहावे असे आव्हान उमरी येथील मा बालाजी बंगारीकर, कैलास सूर्यवंशी, साहेबराव गव्हारकर, राजू झुंजारे, जामगाव गंगाधर गायकवाड निमटेकर, पांडुरंग झिंजोरे प्रकाश टिकेकर सचिन सूर्यवंशी, पिराजी झिंजोरे श्रीनिवास झुंजारे, चिंचाळकर,श्रावण गायकवाड कुदळेकर माधव गायकवाड ढोलउमरीकर रावसाहेब सूर्यवंशी गणेश वाघमारे भायगावकर, साहेबराव दुबळीकर बोथी, रमेश तुराटिकर, माधव धसाडे कोडंगावकर, यांनी आहवान केले आहे तरी सर्वांनी उपस्थिती राहावे ही नम्र विनंती.



# पोलिसांकडून नऊ मोटरसायकली जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** परभणी व सेलू पोलिस प्रसाशनाच्या विशेष पथकाने शहरातून नऊ मोटरसायकल ताब्यात घेतल्या आहेत.

मागील अनेक दिवसा पासून टूव्हीलर गाड्याची चोरी प्रकरण वाढत असल्या मूळे शहरात भितीचे वातावरण झाले या मूळे अविनाश कूमार ( पो.अ.परभणी) आणि राहसाहेब गाडेवाड ( पो.नि.सेलू) यांनी विशेष पथक तयार करून शहरातील रायगड कॉर्नर, विध्या नगर, जवाहर रोड, शाहू नगर, क्रांती चौक, या भागात कार्यवाही करत नऊ मोटरसायकल ताब्यात घेतल्या असून या मोटरसायकलच्या चोरी बाबत तक्रार ग्रामिण पोलिस स्टेशन परभणी, नवा मोंढा पोलिस स्टेशन परभणी, पालम पोलिस स्टेशन, वसमत पोलिस स्टेशन, ओरंगाबाद पोलिस स्टेशन, अहमदनगर पोलिस स्टेशन, मध्य प्रदेश या ठिंकाणी चोरीची नोंद आहे, या कार्यवाही मूळे चोरीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. सदर कारवाहीत सेलू शहर सहाय्यक पोलीस स्टेशनचे अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सेलू पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक रावसाहेब गाडेवार, सुनील अंधारे, अशोक जटाळ, विशेष पथकाचे निलेश कांबळे, शेख खदिर, श्रीहरी मुंडे, कीर्तीश्वर तेलंगे ,संजय सानप, नेताम, माणिक कुलकर्णी, सायबर सेलचे संतोष व्यवहारे यांच्या पथकाने केली.



# डीडी फाउंडेशनतर्फे अनाथ आश्रमात भोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील इंदिरा मुखबधिर निवासी चैतन्य कानिफनाथ अपंग मुलांना तसेच गोपाळपूर, मांडकी येथील चैतन्य कानिफनाथ मतिमंद मुलांना दसऱ्यानिमित्त भोजन वाटप करण्यात आले. या प्रसंगी दिलीप भगवानराव डाखोळे, महेश लगड पाटील, दिलीप माणिक भवर, सतीश राजपूत, आर्जुन पवार, शिवाजी चव्हाण, राम दुधाते यांच्या उपस्थितीत अनाथ आश्रमाला भोजन वाटप करण्यात आले. समाजकार्यात डी.डी. फाउंडेशन मनापासून प्रयत्नशील असते.

# १२ व्या राज्यस्तरीय ड्रॉप - रोबॉल स्पर्धेत संत भगवानबाबा आश्रमशाळा अजिंक्य

आधुनिक केसरी न्यूज



**परभणी :** ता. नांदगाव जि. नाशिक येथे पार पडलेल्या १२ व्या राज्यस्तरीय ड्रॉप-रोबॉल स्पर्धेत संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळा इटोली, ता. जिंतूर, जि. परभणी या आश्रमशाळेच्या संघाने परभणी जिल्ह्याचे नेतृत्व करीत प्रथम क्रमांक पटकावून परभणी जिल्ह्याच्या व आश्रमशाळेच्या शिरपेच्यात मानाचा तुरा खोवला.

या स्पर्धेत संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या संघाने मुंबई संघाचा अंतिम फेरीमध्ये पराभव करून विजय संपादन केला. विजयी संघात आश्रमशाळेतील अभय राठोड,मंगेश सिरामे,आशिष चव्हाण, हनुमान चव्हाण व अभिषेक राठोड हे खेळाडू सहभागी झाले होते. यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रदीप राठोड सर यांचे मार्गदर्शन लाभले. राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचे परभणी जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती गीता गुट्टे मॅडम, संस्थेचे अध्यक्ष श्री प्रतापराव घुगे, सचिव केशवराव घुगे, आश्रमशाळेचे प्राचार्य रमेश दराडे, विजयी खेळाडूंचे पालक तसेच आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# मनपाच्या कारवाईत हातगाडे, पानटपऱ्या जप्त

## मनपा आयुक्तांच्या आदेशानुसार करण्यात आली कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** शहरातील वसमत रोडवरील वाहुकीस अडथळा होत असल्याने तसेच राजगोपालाचारी येथील उद्यानात महिला व लहान मुले मोठ्या प्रमाणात येतात.त्यामुळे या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता लक्षात घेवून राजगोपालाचारी बागेसमोरील खाद्य पदार्थांचे सर्व हातगाडे महापालिकेने कारवाई करून सोमवारी हटवले होते.परंतू त्यानंतर पुन्हा हातगाडेवाले या ठिकाणी परत आल्याने मनपाच्या पथकाने मंगळवार, दि.०४ ऑक्टोबर रोजी कारवाईत करीत १२ हातगाडे व पानटप या जप्त केल्या.

शहरातील राजगोपालाचारी उद्यान ते आरआरपेट्रोल पंप पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुने अतिक्रमण हटाव पथकाने ही कारवाई केली. या कारवाईत मनपाच्या पथकाने १२ हातगाडे, पानटप यांवर कारवाई करीत साहित्य जप्त केले. मनपा आयुक्त तथा प्रशासक तृप्ती सांडभोर यांनी कारवाईचे आदेश दिले होते.या आदेशानुसार स.आयुक्त प्रभाग समिती क शिवाजी सरनाईक यांनी मंगळवारी मनपाच्या कर्मचा यांसह अतिक्रमण हटाव मोहीम राबवून वरील सर्व हातगाडे हटवले.या मोहीमेत स्वच्छता निरीक्षक अब्दुल शादाब, श्रीकांत कुर्हा, लक्ष्मण जोगदंड, प्रल्हाद देशमाने, सौरभ जोगदंड, स्वच्छता कामगार, मुकदम यांच्या सहाय्याने हे अतिक्रमण हटवण्यात आले. उद्यान विभाग पर्यवेक्षक मो.अख्तर, पवन देशमुख यांना बागेच्या मुख्य प्रवेशद्वारावर गर्दी होणार याची दक्षता घ्यावी तसेच या ठिकाणी कोणतेही गाडे लागणार नाहीत याच्या सुचना देण्यात आल्या.

मनपाच्या पथकाने लागोपाठ दोन दिवस केलेल्या कारवाईमुळे रस्त्यावर वाटेल तिथे अतिक्रमण करणाऱ्या हातगाडे तसेच टपरी चालकांचे धाबे दणाणले आहे.



# आदिवासी पर्यटनाला चालना देणार : अशोक चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राज्यात विकासाची कामे करताना विरोधक कामे केली आणि नाही केली तर निंदा करतात. मी त्याकडे दुर्लक्ष करून नांदेड सह राज्याच्या व माझ्या मतदारसंघात विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न करीत राहिन. तालुक्यातील येणाऱ्या काळात आदिवासी भागात पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मंगळवारी ता. (चार) दिली.
तालुक्यात आदिवासी भागातील वाकद येथील सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन व पिपंळढव, हाडोळी गावात कामाचा आढावा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी गोविंद शिंदे नागेलीकर,जगदीश पाटील भोसीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, प्रकाश देशमुख भोसीकर, नामदेव आयलवाड, गोविंद पाटील गौड, बाळासाहेब देशमुख बारडकर, बाबूराव आंदबोरीकर, मारोती बल्लाळकर, रामचंद्र मुसळे,केशव पाटील पोमनाळकर,गंप्पू पाटील, माधव अमृतवाड, मनोज गीमेकर, शिवाजी देवतुळे, पुंडलीक वाकदकर यांची उपस्थिती होती. श्री.चव्हाण म्हणाले की, तालुक्यातील विकासाचा चढता



आलेख असावा म्हणून भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे. तालुक्यात बरीच गावे आदिवासी भाग म्हणून ओळखल्या जातात. त्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा केला आहे. विशेषता शालेय मुला-मुलींना शिणासोबतच वस्तीगृह उभारण्यासाठी माझा प्रयत्न आहे. येणाऱ्या काळात रस्ते, सिंचनासाठी हि सोयीसूवीधा करावयाची आहे. उन्हाळ्यात होणाऱ्या टंचाईवर मात करण्यासाठी ऊर्धव पैनगंगा प्रकल्पातील पाणी वापरण्याची आखणी केली जाणार आहे अशी ग्वाही दिली. प्रास्तावीक अविनाश वाकदकर यांनी केले. लक्ष्मण वाकदकर यांनी सुत्रसंचलन तर आभार डॉ. मांजाळकर यांनी मानले यावेळी परिसरातील बहूसंख्य नागरीक उपस्थित होते.

### पर्यटनाला चालना मिळणार

**भोकर तालुक्यातील व आदिवासी भागातील जनतेला विविध सोयी-सुविधा मिळाव्यात म्हणून भोकर -नांदेड रस्त्यावरील नारवट लगत निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या वन परिसरातील काही जागा संपादित करून आदिवासी प्रर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करावयाचे आहे. पूर्वी याच ठिकाणी बांबू प्रकल्पाची मंजुरी घेतली, त्यामुळे अनेकांना रोजगार मिळणार आहे. तेथील तलावाचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. याचा तालुक्यातील जनतेला लाभ मिळणार आहे अशी माहिती माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिली.**



**परभणी जिल्हा ग्रामीण व परभणी शहरच्या वतीने संजयी केनेकर यांची महाराष्ट्र भाजपा प्रदेश सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना युवा मोर्चा प्रदेश महामंत्री राहुल भैय्या लोणीकर. मंचावर उपस्थित भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कौंडगे, डॉक्टर सुभाष कदम. प्रमोदरावस वाकडकर, विजयराव वरपूडकर, बाळासाहेब जाधव, सुरेश भुमरे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.**

# राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत प्रदीप बडदे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान परळ आयोजित, सहकारी मनोरंजन मंडळ संस्थेच्या शतकपूर्ती निमित्त अध्यक्ष दत्ता मोरे सर यांनी लॉकडाउनच्या सलग दोन वर्षानंतर वाचन-लेखन संस्कृती जपण्याच्या उद्देशाने आणि नवकवी व साहित्यिकांना नवीन व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने "राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धा" रविवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२२ रोजी परळ, मुंबई येथिल संस्थेच्या कार्यालयात आयोजित केली होती. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, पनवेल, रायगड, सातारा, पुणे या ठिकाणाहून स्पर्धकांचा उस्फूर्त प्रतिसाद पाहता समन्वयक विशाल साळवे यांनी स्पर्धेसाठी स्पर्धकांची नावनोंदणी केली.
स्पर्धेसाठी विद्या निकम मॅम आणिअभय पैर हे व्यासंगी व्यक्तीमत्व परीक्षक म्हणून लाभले होते. त्याचप्रमाणे विशाल साळवे आणि वैष्णवी देशमुख यांनी उत्तम निवेदन करत मनमोहक सुत्रसंचालन करून कार्यक्रमाची धुरा सांभाळली. नंदू सावंत सर, महेंद्र कुरघोडे, भाई मयेकर, अनंत जयपूरकर हे संस्थेचे कार्यकारी सदस्य हिरीरीने संमेलनाकरीता हजर झाले होते. मंचीय काव्य सादर करण्याची कला अवगत असणे अत्यंत आवश्यक आहे, असे महेंद्र कुरघोडे सर यांनी कविता सादर करत असताना सर्वांना जाहीरपणे सांगितले.
स्पर्धेत सर्व स्पर्धकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपापल्या परीने उत्तम रचना सादर केल्या. सामाजिक, वैचारिक, निसर्ग, गेय-गद्यकाव्य, तसेच स्वतंत्र भारत अशा विविध विषयांवर कविता वाचन करून स्पर्धकांनी परीक्षकांना संभ्रमात टाकले. परंतु परीक्षकांच्या चौकस आणि उत्कृष्ट निकषानुसार परीक्षणातून ५ विजेते निवडण्यात आले.
**स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे :** प्रथम : प्रदीप बडदे, नवी मुंबई, द्वितीय : सागर सोनावणे, नवी मुंबई, तृतीय : वैभव कानिटकर, डोंबिवली, उत्तेजनार्थ : हर्षद पाटील, पालघर, मनोहर वाळींबे, अंबरनाथ.
विजेत्या स्पर्धकांनी उत्कृष्ट काव्य सादर करून परीक्षकांच्या निकषाप्रमाणे यश संपादन केल्याचे परीक्षक मा.अभय पैर यांनी परीक्षण करताना सांगितले. त्यांच्या परीक्षणाचे आयोजक आणि मान्यवरांनी दिलखुलासपणे कौतुक केले.
संस्थेचे सर्वेसर्वा मा. दत्ताराम मोरे सर हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून त्यांनी श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यसंमेलन, कविसंमेलन तसेच कार्यशाळा आयोजित केल्या आहेत. अशा नियोजनातून गेली ३८ वर्षे त्यांचे महत्त्वपूर्ण असे सहकार्य संस्थेला लाभले. संस्थेचे कार्यकारी मंडळ यांच्या सौजन्याने सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मनोरंजन सहकारी मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच शेवटी आयोजकांनी संस्थेच्या वतीने भविष्यात विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे जाहीर आवाहन केले.



**काव्य स्पर्धेत सहभागी स्पर्धकांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करताना विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य.**

# धुळ्यात शनिवारी गजलनवाज भीमराव पांचाळे यांचा गजल कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सारथी शैक्षणिक सामाजिक संस्था, धुळे, अजिंठा बुद्ध विहार आणि मेडीटेशन संस्था, धुळे यांच्या मार्फत जिल्ह्यात कबीर रत्न पुरस्कार सोहळा शनिवारी सायंकाळी ५:३० वा. विद्यावर्धिनी महाविद्यालय, साक्री रोड, धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात गजलनवाज भीमराव पांचाळे यांचा गजल गायनाचा कार्यक्रम होईल. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तीन व्यक्तींना गुरु मानले होते. त्यापैकी पहिले तथागत गौतम बुध्द, दुसरे संत कबीर आणि तिसरे महात्मा जोतीराव फुले. संत कबीर हे बुद्धांप्रमाणेच वास्तव विचार मांडणारे होते. आज समाजात खऱ्या अर्थाने माणुसकीचे दर्शन घडवून आपल्या कर्माच्या प्रबोधनाच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व जोपासत असलेल्या २८ मान्यवरांना संत कबीरांच्या नावाने सन्मानित करुन हा मानवतावाद जोपासनारा आहे अशी आनंद लोंढे यांनी पत्रकार परिषद येथे माहिती दिली. हा पुरस्कार सामाजिक, प्रशासकीय, राजकीय, शैक्षणिक, क्रिडा, वैद्यकीय, सांस्कृतिक, पत्रकारिता, कला व इतर विविध क्षेत्रात आपले महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांना दिला जाणार आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शासकीय अधिकारी, राजकिय पदाधिकारी, संपादक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पुरस्कार सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला कबीररत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजक आनंद लोंढे, विजय सावकारे, विशाल महाले, डॉ. भरत लोंढे, अनिल ठाकुर, सुदाम भामरे, राहुल पाटील, ॲड. अमोल शिरसाठ, आशिष देशमुख आदी उपस्तित होते.


# युवाशक्ती दुर्गा महोत्साच्या वतीने जिंका मानाची पैठणी कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** येथील युवाशक्ती दुर्गा महोत्सवाच्या वतीने जिंका मानाची पैठणी हा कार्यक्रम दि. ३ रोजी शहरातील कुऱ्हाडे गल्ली परिसरात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे माजी नगराध्यक्ष राणीताई अंकुशराव लाड, माजी नगरसेविका शितल, मीरा लाड, सुनिता झाडगावकर, कीर्ती कत्रुवार यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी होम मिनिस्टर स्पर्धा जिंका मानाची पैठणी कार्यक्रमाचे सादरीकरण सुनीताताई झाडगावकर यांनी केले.
यावेळी शितल कुऱ्हाडे यांनी पहिले बक्षीस पैठणी, राणी लाड- मिक्सर, तृतीय बक्षीस-कुकर मीरा लाड यांच्यातर्फे देण्यात आले. पैठणीचे मानकरी अर्चनाताई लाड ह्या ठरल्या. दुसरे बक्षीस सुषमा हिबारे, तिसरे बक्षीस सपना कहेकर यांनी



पटकावले. जिंका मानाची पैठणी या स्पर्धेत ११० महिला स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. तसेच यावेळी प्रेक्षकांनादेखील प्रश्न विचारण्यात आले त्यांना आकर्षण बक्षीस देण्यात आले.
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राधा दहे, गोदावरी दहे, आशा कुऱ्हाडे, अमर हुंडेकर, अमर दहे, बालाजी लेंगुळे, सचिन चव्हाण, सुनील चव्हाण, अड. श्याम कुऱ्हाडे, अनिल दहे, विशाल अग्रवाल, दीपक बुरांडे, दत्ता होगे, अमोल कुऱ्हाडे, बालाजी बाळू कुऱ्हाडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला शहरातील शेकडो महिलाची उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in